B 34/-

# अनुसूचित जमाती कल्याण समिती

## २०१२-२०१३

## (बारावी महाराष्ट्र विधानसभा)

सत्यमेव जयते

**अमरावती व चंद्रपूर जिल्हा परिषद कार्यालयातील अनुसूचित जमातीच्या अधिकारी/ कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच जात पडताळणी प्रमाणपत्र संदर्भात आढळून आलेल्या त्रुटी व जिल्हा परिषद यंत्रणेमार्फत राबविण्यांत येणाऱ्या विविध कल्याणकारी योजना संबंधीचा अहवाल**

# सातवा अहवाल

- 1 AUG 2013

**( हा अहवाल विधानसभा/विधानपरिषद सभागृहाला दिनांक ....... जुलै, २०१३ रोजी सादर करण्यात आला )**

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई-४०० ०३२.
जुलै, २०१३.

# अनुसूचित जमाती कल्याण समिती

## २०१२-२०१३

## (बारावी महाराष्ट्र विधानसभा)

अमरावती व चंद्रपूर जिल्हा परिषद कार्यालयातील अनुसूचित जमातीच्या अधिकारी/ कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच जात पडताळणी प्रमाणपत्र संदर्भात आढळून आलेल्या त्रुटी व जिल्हा परिषद यंत्रणेमार्फत राबविण्यांत येणाऱ्या विविध कल्याणकारी योजना संबंधीचा अहवाल

# सातवा अहवाल

# अनुसूचित जमाती कल्याण समिति

## २०१२-२०१३

### समिती प्रमुख

(१) श्री. जगदीशचंद्र वळवी, वि.स.स.

### सदस्य

(२) श्री. के.सी. पाडवी, वि.स.स.

(३) श्री. केवलराम काळे, वि.स.स.

(४) श्री. दीपक आत्राम, वि.स.स.

(५) श्री. हरिदास भदे, वि.स.स.

(६) श्री. प्रशांत बंब, वि.स.स.

(७) श्री. शरद गावित, वि.स.स.

(८) श्री. उमाजी बोरसे, वि.स.स.

(९) श्री. प्रकाश (अण्णा) शेंडगे, वि.स.स.

(१०) श्री. दौलत दरोडा, वि.स.स.

(११) श्री. धनराज महाले, वि.स.स.

(१२) श्री.शरद रणपिसे, वि.प.स.

(१३) श्री. अमरनाथ राजूरकर, वि.प.स.

(१४) श्री. रमेश शेंडगे, वि.प.स.

(१५) डॉ. दीपक सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. अनंत कळसे, प्रधान सचिव.

(२) श्री. म. मु. काज, उप सचिव.

(३) श्री. ला. ना. जाधव, अवर सचिव (समिती).

---

**टिप :** (१) मा. विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा यांनी केलेल्या शिफारशीवरून समिती सदस्य ॲड. चिंतामण वनगा, वि.स.स, यांच्या ऐवजी श्री. प्रकाश (अण्णा) शेंडगे, वि.स.स. यांची दिनांक २५ जुलै २०१२ रोजी समिती सदस्य म्हणून नामनियुक्ती करण्यात आली आहे.

(२) श्री. एस. क्यु. जामा, वि.प.स. यांचा सदस्याचा कार्यकाळ संपल्यामुळे समिती वरील रिक्त झालेल्या पदी श्री. शरद रणपिसे, वि.प.स. यांची दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१२ रोजी समिती सदस्य म्हणून नामनियुक्ती करण्यात आली आहे.

(३) डॉ. दीपक सावंत, वि.प.स. यांची दिनांक ७ जुलै २०१२ रोजी मुदत संपुष्टात आल्याने मा. सभापती यांनी दिनांक २४ ऑगस्ट २०१२ रोजी त्यांची समितीवर समिती सदस्य म्हणून फेरनियुक्ती केली आहे.

# महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
## अनुसूचित जमाती कल्याण समिति
## २०१०-२०११

### समिती प्रमुख

(१) श्री. सुरेश धस, वि.स.स.

### सदस्य

(२) श्री. हरिदास भदे, वि.स.स.
(३) श्री. रामरतनबापू राऊत, वि.स.स.
(४) श्रीमती निर्मला गावित, वि.स.स.
(५) श्री. राजाराम ओझरे, वि.स.स.
(६) श्री. जगदीशचंद्र वळवी, वि.स.स.
(७) श्री.किसन कथोरे, वि.स.स.
(८) श्री. उमाजी बोरसे, वि.स.स.
(९) ॲड. चिंतामण वनगा, वि.स.स.
(१०) श्री. दौलत दरोडा, वि.स.स.
(११) श्री. धनराज महाले, वि.स.स.
(१२) श्री.एम.एम.शेख, वि.प.स.
(१३) श्री.वसंतराव खोटरे, वि.प.स.
(१४) श्री. रमेश शेंडगे, वि.प.स.
(१५) श्री. परशुराम उपरकर, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. अनंत कळसे, प्रधान सचिव.
(२) श्री. म. मु. काज, उप सचिव.
(३) श्री. ला. ना. जाधव, अवर सचिव (समिती).

---

**टिप :** (१) श्री.राजेंद्र मुळक, वि.प.स. यांची राज्यमंत्री पदी नियुक्ती झाल्याने त्यांच्या रिक्त झालेल्या पदावर श्री.वसंतराव खोटरे, वि.प.स. यांची दिनांक १७ फेब्रुवारी २०११ रोजी समिती सदस्य म्हणून नामनियुक्ती करण्यात आलेली आहे.

(२) प्रा.वसंत पुरके, वि.स.स. यांची उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा पदी नियुक्ती झाल्याने त्यांच्या रिक्त झालेल्या पदावर श्री.हरिदास भदे, वि.स.स. यांची दिनांक ७ मार्च २०११ रोजी समिती सदस्य म्हणून नामनियुक्ती करण्यात आलेली आहे.

# अनुसूचित जमाती कल्याण समिति
## २०१०-२०११

### समिती प्रमुख

(१) श्री. सुरेश धस, वि.स.स.

### सदस्य

(२) प्रा. वसंत पुरके, वि.स.स.

(३) श्री. रामरतनबापू राऊत, वि.स.स.

(४) श्रीमती निर्मला गावित, वि.स.स.

(५) श्री. राजाराम ओझरे, वि.स.स.

(६) श्री. जगदीशचंद्र वळवी, वि.स.स.

(७) श्री.किसन कथोरे, वि.स.स.

(८) श्री. उमाजी बोरसे, वि.स.स.

(९) ॲड. चिंतामण वनगा, वि.स.स.

(१०) श्री. दौलत दरोडा, वि.स.स.

(११) श्री. धनराज महाले, वि.स.स.

(१२) श्री.एम.एम.शेख, वि.प.स.

(१३) रिक्त

(१४) श्री. रमेश शेंडगे, वि.प.स.

(१५) श्री. परशुराम उपरकर, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव.

(२) श्री. म. मु. काज, उप सचिव.

(३) श्री. ला. ना. जाधव, अवर सचिव (समिती).

---

**टिप.**—(१) श्री. आनंदराव गेडाम, वि.स.स यांची विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीवर समिती प्रमुख म्हणून नियुक्ती झाल्याने त्यांच्या रिक्त झालेल्या पदावर प्रा. वसंत पुरके, वि.स.स यांची दिनांक १३ ऑक्टोबर २०१० रोजी समिती सदस्य म्हणून नामनियुक्ती करण्यात आलेली आहे.

(२) श्री. राजेंद्र मुळक, वि.प.स. यांची राज्यमंत्रीपदी दिनांक १९ नोव्हेंबर २०१० रोजी नियुक्ती झालेली असल्याने जागा रिक्त.

# प्रस्तावना

मी, अनुसूचित जमाती कल्याण समितीचा समिती प्रमुख, समितीने अधिकार दिल्यावरुन **समितीचा सातवा अहवाल** सभागृहास सादर करीत आहे.

समितीने अमरावती व चंद्रपूर जिल्हा परिषद कार्यालयांतील अनुसूचित जमातीच्या अधिकारी व कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच जात पडताळणी प्रमाणपत्र संदर्भात आढळून आलेल्या त्रुटी व जिल्हा परिषद यंत्रणेमार्फत अनुसूचित जमातीसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांबाबत माहिती घेण्याचे ठरविले. त्यानुसार समितीने दिनांक २९ व ३० ऑक्टोबर २०१० रोजी अमरावती येथे व दिनांक ३ ते ५ फेब्रुवारी २०११ रोजी चंद्रपूर येथे बैठक घेण्यात आली. उक्त जिल्ह्यातील बैठकीच्या वेळी समितीने जिल्हा परिषद व जिल्हाधिकारी कार्यालयाकडून मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा केली. तसेच जिल्ह्यातील प्रकल्प कार्यालयांतर्गत अनुसूचित जमातीच्या लोकांसाठी राबविण्यात आलेल्या कामांना भेटी देऊन चर्चा करण्यात आली. उक्त बैठकीच्या वेळी समितीला दिलेल्या आश्वासित मुद्दयांच्या अनुषंगाने समितीने अनुक्रमे दिनांक ९ मे २०१३ व २७ जून २०१३ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या वेळी मिळालेल्या माहितीवर सखोल विचार करून समितीने त्या संदर्भात नोंदविलेले आपले अभिप्राय व शिफारशी या अहवालात समाविष्ट केल्या आहेत.

विभागीय सचिवांनी तसेच इतर संबंधित अधिकाऱ्यांनी समितीस माहिती देऊन केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांची आभारी आहे.

समितीने प्रारुप अहवाल दिनांक २३ जुलै २०१३ रोजीच्या बैठकीत विचारात घेतला व तो संमत केला.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक २३ जुलै २०१३.

**जगदिशचंद्र वळवी,**
समिती प्रमुख,
अनुसूचित जमाती कल्याण समिती.

# अहवाल

जिल्हा परिषद, अमरावती

## (१) ग्रामसेवक यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास विलंब लावणे

अनुसूचित जमाती कल्याण समितीची दिनांक २८ ते ३० ऑक्टोबर २०१० या कालावधीत अमरावती येथे बैठक झाली. समितीने दिनांक २९ ऑक्टोबर २०१० रोजी जिल्हा परिषद, अमरावती येथील कार्यालयास भेट दिली. जिल्हा परिषद कार्यालयातील वर्ग ३ व ४ च्या कर्मचारी वर्गाच्या संदर्भात अनुसूचित जमातीच्या उमेदवारांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच अनुसूचित जमातीच्या लोकांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनेबाबत समितीने पाठविलेल्या प्रश्नावलीच्या अनुषंगाने जिल्हा परिषद, अमरावती यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे समितीने बैठकीत आढावा घेतला.

ग्रामसेवक संवर्गात अनुसूचित जमातीची ३३ पदे भरलेली आहेत व ३ पदे रिक्त आहेत. त्यापैकी एका पदावर उमेदवाराची निवड झाली असून जात वैधता प्रमाणपत्र अप्राप्त असल्यामुळे त्यांना नियुक्ती दिली नाही. कर्मचाऱ्याने जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यामुळे त्या कर्मचाऱ्यास सेवेतून कमी केल्यामुळे एक पद रिक्त आहे व एक पद कर्मचाऱ्याची जून, १९९५ पुर्वीची नेमणूक असल्यामुळे व जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यामुळे त्याला खुल्या प्रवर्गात सामावुन घेण्यात आले. सन १९९५ चा शासन निर्णय आहे, जर त्या कर्मचाऱ्याचे जात प्रमाणपत्र अवैध झाले आहे आणि तो खुल्या प्रवर्गाचा असेल तरच त्याला खुल्या प्रवर्गात घेता येते. जात प्रमाणपत्र अवैध होऊन त्याची जात खुल्या प्रवर्गात करून घेता येणार नाही. आपण त्याला खुल्या प्रवर्गात कसे काय समाविष्ट करून घेतले आहे? त्याला जर पदोन्नती मिळाली असेल तर तो पदोन्नत होईल. त्याला खुल्या प्रवर्गात सामावून घेतल्यामुळे खुल्या प्रवर्गावर अन्याय होईल. या ग्रामसेवकाला खुल्या प्रवर्गामध्ये का समाविष्ट करून घेतले आहे अशी समितीने विचारणा केली असता उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.यांनी ग्रामसेवकाची पदे एप्रिल २०१० पासून रिक्त आहेत. या ग्रामसेवकाने जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यामुळे त्याला खुल्या प्रवर्गात समाविष्ट करण्यात आले आहे असे समितीला सांगण्यात आले.

समितीने हे प्रकरण जात पडताळणी समितीकडे सादर झालेले नसेल तर त्याला सन १९९५ च्या शासन निर्णयाप्रमाणे संरक्षण द्यावे. त्या ग्रामसेवकाने जिल्हा परिषदेकडे कागदपत्रे सादर करावीत. जिल्हा परिषदेने ती कागदपत्रे जात पडताळणी समितीकडे सादर करावीत आणि समितीने प्रमाणपत्र अवैध केले तर त्याची जी जात असेल त्या प्रर्वगामध्ये त्याला समाविष्ट करावे व विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी केलेल्या कारवाईची माहिती समितीला सादर करावी असे निदेश दिले.

समितीने दिनांक ९ मे २०१३ रोजी विधान भवन, मुंबई येथे विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी उपरोक्त मुद्या संदर्भात ग्रामसेवकांची रिक्त असलेली पदे व जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्याबाबत पुढीलप्रमाणे लेखी स्वरूपात समितीला माहिती देण्यात आली.

ग्रामसेवक संवर्गात अनुसूचित जमातीची ३३ पदे भरलेली आहेत व ३ पदे रिक्त आहेत रिक्त पदांबाबत खालील प्रमाणे अनुपालन सादर करण्यात येत आहे :—

(१) निवड करण्यात आलेल्या एका पदावर संबंधित कु.मंगला साळुंके यांचेकडून अनुसूचित जमातीचे जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त झाल्यामुळे त्यांना या कार्यालयाचे आदेश क्र.जिप/पंचा/स्था१/ ११७४८/१०, दिनांक ३ नोव्हेंबर २०१० अन्वये नियुक्ती देण्यात आली.

(२) श्री.एस.ए.कोठेकर, ग्रामसेवक यांची नियुक्ती दिनांक ७ नोव्हेंबर १९९० रोजीची आहे. तथापि, गेली २० वर्षांपासून संबंधितांस वारंवार पत्रे देऊनही त्यांनी अनुसूचित जमाती जात पडताळणी समितीकडे जातीचे प्रमाणपत्र पडताळणीकरिता आवश्यक कागदपत्र कार्यालयाकडे सादर केली नाहीत. या कार्यालयाने पत्र क्र.१००६ दिनांक ३० जानेवारी २००० अन्वये अंतिम नोटीस देऊन खुलासा सादर करण्याकरिता कळविले असुनही खुलासा सादर केला नाही. संबंधितांची जात “हलबा” असून नियुक्ती जून, १९९५ पुर्वीची असल्यामुळे शासन निर्णयाचे अनुषंगाने त्यांना सेवेत संरक्षण देण्यात आले आहे. परंतु जात “हलबा” असून सदर जात अनुसूचित जमाती प्रवर्गात मोडते किंवा कसे? याबाबत जात पडताळणीचा निर्णय न झाल्यामुळे त्यांना या कार्यालयाचे आदेश क्र.जिप/पंचा/स्था१/२८९८/१०, दिनांक ३१ मार्च २०१० अन्वये तात्पुरत्या स्वरूपात खुल्या प्रवर्गात सामावून घेण्यात आले आहे. जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त झाल्यावर त्यांना निर्णयानुसार दिलेल्या प्रवर्गात सामावून घेण्यात येईल.

वरीलप्रमाणे लेखी स्वरूपात दिलेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने जिल्हा परिषद, अमरावती येथे झालेल्या बैठकीत समितीला अशी माहिती देण्यात आली होती की, ग्रामसेवकांची अनुसूचित जमातीची ३३ पदे भरलेली आहेत व ३ पदे रिक्त आहेत. त्यापैकी एका पदावर उमेदवाराची निवड झाली असून जात वैधता प्रमाणपत्र अप्राप्त असल्यामुळे त्यांना नियुक्ती दिली नाही. १ पद जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यामुळे सेवेतून कमी केल्यामुळे रिक्त आहे व एक पद जून, १९९५ पूर्वीची नेमणूक असल्यामुळे व जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यामुळे खुल्या प्रवर्गात सामावून घेण्यात आले आहे. त्या ग्रामसेवकाचे जात प्रमाणपत्र अवैध झालेले आहे का? अशी विचारणा केली असता, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प. यांनी ग्रामसेवक श्री. एस. ए. कोठेकर यांनी पडताळणीसाठी कागदपत्रे सादर न केल्यामुळे त्यांची कार्यवाही अद्याप झालेली नाही असे समितीला सांगितले. समितीने ग्रामसेवकांनी किती वर्षापासून कागदपत्रे सादर केलेली नाहीत? कायद्यात काय तरतूद आहे? जिल्हा परिषद येथील बैठकीत अधिकाऱ्यांकडून समाधानकारक उत्तर न मिळाल्यामुळे हा मुद्दा साक्षीमध्ये आलेला आहे. त्यामुळे या मुद्याच्या संदर्भात सचिवांनी खुलासा करावा असे निदेश दिले.

ज्या कर्मचाऱ्यांनी कागदपत्रे सादर केली नसतील त्या कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल, परंतु सन १९९५ पूर्वीचे जे कर्मचारी आहेत त्यांना सरसकट सेवेतून कमी न करता त्यांना खुल्या प्रवर्गामध्ये टाकावयाचे आहे. दिनांक १५ जून १९९५ पूर्वी अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राच्या आधारे शासकीय कर्मचारी सेवेत लागला असेल आणि त्याचे जात प्रमाणपत्र अवैध ठरल्यास तो ज्या मागास प्रवर्गातील असेल त्या प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र त्याने दिले तरच त्यांना संरक्षण आहे. सामान्य प्रशासन विभागाने दिनांक ३० जून २००४ च्या शासन निर्णयामध्ये दिनांक २७ मे २००२ चा शासन निर्णय अधिक्रमित करून सुधारित आदेश दिलेले आहेत. त्यामध्ये जे बिगर आदिवासी अनुसूचित जमातीच्या राखीव जागेवर दिनांक १५ जून १९९५ पूर्वी शासकीय किंवा पदावनत करू नये, निमशासकीय सेवेत लागले असतील किंवा पदोन्नती मिळाली असेल त्यांना सेवेतून काढण्यात येऊ नये किंवा ते ज्या घटकाचे आहेत त्या घटकामध्ये त्यांना टाकण्यात यावे, त्यामध्ये त्यांना त्या घटकाचे फायदे देय असतील व अशा प्रकारे रिक्त झालेले पद अनुसूचित जमातीतून भरण्यात यावे असा उल्लेख केला आहे. परंतु त्यांना सरसकट काढून टाकावे असे शासन निर्णयामध्ये म्हटलेले नाही असे प्रधान सचिव, ग्राम विकास यांनी समितीला सांगितले.

समितीने अशा कर्मचाऱ्यांना खुल्या प्रवर्गामध्ये घ्यावे असे त्या शासन निर्णयामध्ये म्हटलेले नाही. ते ज्या घटकातील आहेत त्या घटकात त्यांना टाकावयाचे आहे. तो त्या त्या घटकात जाऊ शकतो पण त्यासाठी जात पडताळणी करणे आवश्यक आहे. तो ज्या घटकाचा असल्याचे सिद्ध होईल त्याला त्यामध्ये समाविष्ट करावयाचे आहे असे समितीचे मत आहे. यावर विभागीय सचिव, ग्रामविकास विभाग यांनी एखादा कर्मचारी आदिवासी म्हणून नोकरीला लागला आणि तो जर प्रमाणपत्र सादर करू शकला नाही तर त्याचा अर्थ असा की, त्याच्याकडे अनुसूचित जमातीचा पुरावा नाही. किंवा ज्या इतर कोणत्याही घटकाचा पुरावा असेल तर त्या घटकामध्ये तो जाईल पण त्या घटकाचा त्याच्याकडे काहीही पुरावा नसल्यास, त्याने जात वैधता प्रमाणपत्र दाखल केले नाही तरी त्यांना संरक्षण दिलेले आहे. तोपर्यंत त्याची खुल्या प्रर्वगामध्ये नोंदणी केले पाहिजे असे समितीला सांगितले.

समितीने शासन निर्णयामध्ये त्याला खुल्या प्रवर्गामध्ये टाकावे असे म्हटलेले नाही. त्यांची जात पडताळणी करणे बंधनकारक आहे. त्यानंतरच तो कोणत्या प्रवर्गातील आहे हे कळेल. त्यानंतर त्यांना त्या त्या प्रवर्गामध्ये टाकावयाचे आहे. अन्यथा त्या प्रवर्गावर अन्याय होईल. खुल्या प्रवर्गावर अन्याय कशासाठी करावायाचा? सन १९९५ पूर्वीच्या लोकांना संरक्षण दिलेले आहे आणि ते ज्या प्रवर्गातील असतील त्या प्रवर्गामध्ये त्यांना टाकावयाचे आहे. अनुसूचित जमातीच्या जागेवर लागला असेल ती जागा रिक्त करून तो ज्या प्रवर्गामधील असेल त्यामध्ये त्याला टाकावयास पाहिजे. सहा महिन्याच्या आत जात पडताळणी करून घ्यावयास पाहिजे होती. त्यांचा प्रस्ताव जात पडताळणी समितीकडे गेलेला नाही. याचा अर्थ तो बोगस

आदिवासी आहे. आपल्या विभागाकडून जात पडताळणी समितीकडे प्रस्ताव का पाठविला नाही? अशी समितीने पृच्छा केली. त्यावर विभागीय सचिव, आदिवासी विकास विभाग यांनी सन १९९५ पूर्वीच्या कर्मचाऱ्यांना संरक्षण दिलेले आहे. त्यांना नोकरीतून काढून टाकता येत नाही. त्याने जर आदिवासीचे प्रमाणपत्र लावले नसते तर त्यांची नेमणूक झाली नसती. त्याने आदिवासीचे प्रमाणपत्र दिल्यामुळे त्यांना अनावश्यक फायदा मिळतो. आदिवासीमध्ये स्पर्धा कमी असल्यामुळे आणि त्याने आदिवासीचे प्रमाणपत्र सादर केल्यामुळे त्याची निवड झाली. नाहीतर तो खुल्या प्रवर्गामधून नियुक्त झालाच नसता. जे कर्मचारी जात पडताळणी समितीकडे जात नसतील त्यांनी जी कागदपत्रे विभागाकडे सादर केली आहेत ती जात प्रमाणपत्र तपासणी समितीकडे पाठवावीत. त्यांनी चुकीचे प्रमाणपत्र सादर करून शासनाची दिशाभूल केली या कारणास्तव नोटीस दिली पाहिजे तसेच त्यांची विभागीय चौकशी केली पाहिजे असे समितीला सांगितले.

शासकीय अधिकाऱ्यांकडून जात वैधता प्रमाणपत्रे दिली जातात. आपल्या खात्याने त्यांची जात पडताळणी केलेली नाही. त्यांनी जर कागदपत्राची पूर्तता केली नसेल तर आतापर्यंत त्यांच्यावर कारवाई का केली नाही? तो ज्या घटकाचा असेल त्या घटकामध्ये त्याला दाखवावे. जागा रिक्त झाली तर ती जागा अनुसूचित जमातीमधून भरता येईल. आज किमान अनुसूचित जमातीची जागा रिक्त व्हावयास पाहिजे होती. त्याला सेवेतून काढू नये असे संरक्षण आहे. परंतु आदिवासीची जागा रिक्त झाली असती तर ती जागा अनुसूचित जमातीच्या उमेदवारांमधून भरली गेली असती. आज साक्षीला येत असताना अनुसूचित जमातीचा बिंदू रिक्त झालेला नाही आणि अनुसूचित जमातीचा उमेदवार भरलेला नाही. अशी समितीने विचारणा केली, यावर विभागीय सचिव, आदिवासी विकास विभाग यांनी हा ग्रामसेवक अनुसूचित जमातीचा नाही त्यांच्याकडे अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र नाही असे कारण न देता वेळोवेळी सूचना देऊन सुद्धा त्यांनी जात प्रमाणपत्र तपासणी समितीकडे कागदपत्रे दाखल न करता जाणूनबुजून फसवणूक केली आहे. असे कारण दाखवून व त्याला नोटीस देऊन अनुसूचित जमातीचा बिंदू रिक्त करावा तसेच त्यांची विभागीय चौकशी करून समितीला अनुपालन अहवाल सादर करावा असे समितीला सांगितले.

समितीने श्री.कोठेकर यांना सन २००९ मध्ये निलंबित करून चार वर्षांचा कालावधी होऊन गेलेला असताना सुद्धा त्याची अजूनही चौकशीच चालू आहे. चौकशी किती वर्षे चालू ठेवावी याला काही नियम आहेत. त्यांनी निधीची अफरातफर केलेली आहे. त्या अनुषंगाने त्यांच्यावर दोषारोप पत्रे दाखल करून सुरू केलेली कारवाई किती दिवसात पूर्ण करणार आहात अशी पृच्छा केली असता विभागीय सचिव, आदिवासी विकास विभाग यांनी श्री.कोठेकर यांना जात वैधता प्रमाणपत्रासाठी आवश्यक असणारी कागदपत्रे सादर करण्यासंबंधी नोटीसा बजावल्या असतील, परंतु त्यांचेकडून स्पष्टीकरण येत नसेल तर त्यांच्या बाबतीत जिल्हा परिषदेने एकतर्फी निर्णय घेऊन टाकावा. त्यांना जात वैधता प्रमाणपत्र सादर

करण्यासाठी आवश्यक ती कागदपत्रे सादर केली नाहीत म्हणून त्यांचे विरुद्ध खातेनिहाय चौकशी करून कारवाई करावी व त्या बाबतची माहिती मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी समितीला दोन महिन्यात सादर करावी असे विशद केले.

श्री. कोठेकर, ग्रामसेवक यांची नियुक्ती दिनांक ७ नोव्हेंबर १९९० पासूनची आहे. तथापि, गेल्या २० वर्षापासून संबंधितास वारंवार पत्रे देऊनही त्यांनी अनुसूचित जमाती पडताळणी समितीकडे जात पडताळणी करिता आवश्यक कागदपत्रे कार्यालयाकडे सादर केली नाही. या कार्यालयाने पत्र क्रमांक १००६ दिनांक ३० जानेवारी २००० अन्वये अंतिम नोटीस देऊन खुलासा सादर करण्याकरिता कळविले असून खुलासा सादर केला नाही. संबंधिताची जात "हलबा" असून नियुक्ती जून १९९५ पूर्वीची असल्यामुळे शासन निर्णयाचे अनुषंगाने कार्यवाही करण्याचे निर्देश आहेत. त्यामुळे त्यांना सेवेत संरक्षण देण्यात आले आहे. परंतु जात हलबा असून सदर जात अनुसूचित जमातीमध्ये मोडते किंवा कसे या बाबत निर्णय न झाल्यामुळे त्यांना या कार्यालयाचे आदेश दिनांक ३१ मार्च २०१० अन्वये तात्पुरत्या स्वरूपात खुल्या प्रवर्गात सामावून घेण्यात आले आहे. जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर त्यांना निर्णयानुसार दिलेल्या प्रवर्गात सामावून घेण्यात येईल अशा प्रकारचा लेखी खुलासा समितीला दिलेला आहे. श्री. कोठेकर यांनी जात वैधता प्रमाणपत्रासाठी आवश्यक असणारी कागदपत्रे कार्यालयाकडे सादर केलेली नसताना "संबंधिताची जात हलबा असून" अशा प्रकारची लेखी माहिती कशाच्या आधारावर दिली आहे? अशी समितीने पुन्हा विचारणा केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.यांनी नियुक्तीच्या वेळी त्यांनी हलबा जातीचे प्रमाणपत्र सादर केले आहे. आता शासनाने हलबा या समाजास एस.बी.सी.मध्ये टाकलेले आहे. त्यांना वारंवार नोटीस देऊनही त्यांनी जात पडताळणीसाठी आवश्यक असणारी कागदपत्रे कार्यालयाकडे सादर केलेली नाहीत. असे समितीला सांगितले.

समितीने हा विषय सन २०१० पासून सुरू आहे. त्यांना कागदपत्रे सादर करण्यासाठी दोन किंवा तीन महिन्याच्या कालावधी द्यावयास पाहिजे होता, परंतु तसा निश्चित कालावधी संबंधित अधिकाऱ्यांकडून दिला नाही. त्यामुळे हे प्रकरण प्रलंबित आहे. तसेच अंतिम नोटीस देऊन ही त्यांनी खुलासा सादर केला नाही. संबंधित कर्मचाऱ्यांची जात "हलबा" आहे अशा प्रकारचा शब्द प्रयोग लेखी उत्तरात कशाच्या आधारे केलेला आहे अशी पुच्छा केली असता, यावर विभागीय सचिव, ग्रामविकास विभाग यांनी सदर कर्मचाऱ्यास नोटीसा देऊनही त्यांनी जात पडताळणीसाठी आवश्यक असणारी कागदपत्रे सादर केली नाहीत म्हणून खातेनिहाय चौकशी करून कारवाई करावी व त्यासंबंधीची माहिती दोन महिन्यात समितीला सादर करावी असे समितीला विशद केले.

समितीने या प्रकरणास जवळपास २० वर्षाचा कालावधी घेतला आहे. तरी देखील सदर प्रकरण निकाली निघालेले नाही. याचा अर्थ संबंधित अधिकाऱ्यांनी जाणीवपूर्वक या गोष्टीकडे दुर्लक्ष केले आहे. ज्या अधिकाऱ्यांनी या प्रकरणाकडे जाणिवपुर्वक दुर्लक्ष केले आहे, त्यांच्या विरुद्ध देखील कारवाई झाली पाहिजे असे समितीचे स्पष्ट मत आहे. अशा प्रकारणाबाबंत वेळीच कारवाई झाली तरच आदिवासी समाजाला न्याय मिळू शकेल. खरे तर आजच्या साक्षीत या प्रकरणी केलेल्या कारवाईची माहिति अधिकाऱ्यांनी आणावयास पाहिजे होती. परंतु तशा प्रकारची माहिती संबंधित अधिकाऱ्यांनी आणली नाही. श्री.कोठेकर यांच्या बाबतीत त्वरित कारवाई झाली पाहिजे. त्यांना कोणत्याही प्रकारचे संरक्षण देण्यात येऊ नये. संविधानाने आरक्षण ठरवून दिलेले आहे. अशा प्रकरणांना प्रलंबित ठेवून एक प्रकारे संविधानाची पायमल्ली केली जात आहे. संविधानाने ठरवून दिलेल्या आरक्षणाची अंमलबजावणी योग्य पद्धतीने झाली पाहिजे. एखाद्या अधिकाऱ्याने वा कर्मचाऱ्याने सहा महिन्याच्या आत जात वैधता प्रमाणपत्र अथवा त्यासाठी लागणारी कागदपत्रे सादर केली नाहीत तर त्या अधिकारी अथवा कर्मचाऱ्याविरुद्ध कारवाई झाली पाहिजे असे समितीचे स्पष्ट मत आहे. गेल्या अनेक वर्षापासून अनुसूचित जमाती या प्रवर्गातील उमेदवारांवर अन्याय होत आहे. अनेक अधिकारी आणि कर्मचारी अशा प्रकारची फसवणूक करीत आहेत. या बाबतीत शासनाने एखादा वेगळा कायदा केला पाहिजे. श्री. कोठेकर यांची खुल्या प्रवर्गात नेमणूक केली आहे, परंतु अजून अनुसूचित जमातीसाठी असलेला बिंदू मोकळा करण्यात आलेला नाही. तो बिंदू तात्काळ मोकळा करावा. सहा महिन्याच्या आत जात वैधता प्रमाणपत्र अथवा त्यासाठी आवश्यक असणारी कागदपत्रे संबंधित कर्मचाऱ्याने सादर केली नाहीत तर त्याच्यावर तात्काळ कारवाई झाली पाहिजे. या प्रकरणाकडे ज्या ज्या अधिकाऱ्यांनी जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले आहे त्यांचे विरुद्ध कारवाई करावी आणि त्या बाबतची माहिती समितीला कळवावी असे समितीने निदेश दिले.

विभागीय सचिव, आदिवासी विकास विभाग यांनी अनुसूचित जमातीसाठी असलेला बिंदू तातडीने मोकळा करावा आणि त्या पदावर अनुसूचित जमातीच्या उमेदवारास नियुक्ती द्यावी. श्री. कोठेकर यांना नोटीस देऊनही जात पडताळणीसाठी आवश्यक असणारी कागदपत्रे सादर केली नाहीत, तसेच या संदर्भात कोणत्याही प्रकारचे स्पष्टीकरण त्यांनी केलेले नाही म्हणून त्यांचे विरुद्ध कारवाई करण्यात यावी. तसेच जात पडताळणी प्रमाणपत्रासाठी आवश्यक असणारी कागदे त्यांनी वारंवार नोटिसा देऊनही कार्यालयास सादर केलेली नाहीत व सध्या ते निलंबितही आहेत. त्यामुळे त्यांच्यावर सेवेतून कमी करण्याबाबतची देखील कारवाई होऊ शकते. शासकीय सेवेत रुजू होण्यासाठी उच्च न्यायालयाने सहा महिन्यांची मुदत घालून दिलेली आहे. नव्याने शासकीय सेवेत रुजू झालेल्या कर्मचाऱ्याने सहा महिन्यात जात वैधता प्रमाणपत्र सादर करावे अन्यथा सहाव्या महिन्याच्या शेवटच्या तारखेस आपली नेमणूक समाप्त होईल अशा प्रकारचे लेखी पत्र नेमणुकीच्या वेळी कर्मचाऱ्यास दिले जाते. असे समितीच्या निदर्शनास आणून दिले. समितीने श्री. कोठेकर यांच्या बाबतीत येत्या दोन महिन्यात खातेनिहाय चौकशी करून कार्यवाही करण्यात यावी व त्या बाबतची माहिती समितीला कळविण्यात यावी असे समितीचे निदेश आहेत.

अभिप्राय व शिफारशी :-

(१) जिल्हा परिषद, अमरावती या कार्यालयाअंतर्गत कार्यरत असलेल्या ग्रामसेवक संवर्गात अनुसूचित जमातीची तीन पदे रिक्त आहेत. त्यापैकी एका पदावर उमेदवाराची निवड झाली असून जात वैधता प्रमाणपत्र अप्राप्त असल्यामुळे त्यांना नियुक्ती दिली नाही. कर्मचाऱ्याने जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यामुळे त्या कर्मचाऱ्यास सेवेतून कमी केल्यामुळे एक पद रिक्त आहे व एक पद कर्मचाऱ्याची जून, १९९५ पूर्वीची नेमणुक असल्यामुळे व जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यामुळे त्याला खुल्या प्रवर्गात सामावून घेण्यात आले.अशा विविध कारणांनी तीन पदे रिक्त आहेत.शासन निणर्यानुसार सन १९९५ पूर्वीच्या लोकांना संरक्षण दिलेले आहे परंतु संबंधित कर्मचाऱ्यांनी जात पडताळणी समितीसमोर कागदपत्रे सादर करावयाची असतात जर त्यांनी ते केले नाही तर कार्यालयाकडे त्यांनी जी कागदपत्रे सादर केली असतील ती जात प्रमाणपत्र तपासणी समितीकडे पाठवावीत. कर्मचाऱ्यांनी जात पडताळणी समितीकडून सहा महिन्याच्या आत जात प्रमाणपत्र पडताळणी करून घ्यावयास पाहिजे. त्यांनी चुकीचे प्रमाणपत्र सादर करून शासनाची दिशाभूल केली या कारणास्तव त्यांना नोटीस दिली पाहिजे तसेच त्यांची विभागीय चौकशी केली पाहिजे. ग्रामसेवक अनुसूचित जमातीचा नाही त्यांच्याकडे अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र नाही असे कारण न देता वेळोवेळी सूचना देऊन सुद्धा त्यांनी जात प्रमाणपत्र तपासणी समितीकडे कागदपत्रे दाखल न करता जाणूनबुजून फसवणूक केली आहे असे कारण दाखवून व त्याला नोटीस देऊन अनुसूचित जमातीचा बिंदू रिक्त करून अनुसुचित जमातीचा उमेदवार भरण्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला पाठविण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.

(२) श्री.कोठेकर, ग्रामसेवक यांची नियुक्ती दिनांक ७ नोव्हेंबर १९९० पासूनची आहे. तथापि गेल्या २० वर्षापासून संबंधितास वारंवार पत्रे देऊनही त्यांनी अनुसूचित जमाती पडताळणी समितीकडे जात पडताळणी करिता आवश्यक असणारी कागदपत्रे कार्यालयाकडे सादर केली नाही. तसेच खुलासा सादर करण्याकरिता दिनांक ३० जानेवारी २००० रोजी अंतिम नोटीस देऊन सुद्धा त्यांनी खुलासा सादर केला नाही. श्री.कोठेकर यांना जात वैधता प्रमाणपत्रासाठी आवश्यक असणारी कागदपत्रे सादर करण्यासंबंधी नोटीसा बजावल्या असतील व त्यांचेकडून स्पष्टीकरण येत नसेल तर त्यांच्या बाबतीत जिल्हा परिषदेने एकतर्फी निर्णय घेऊन त्यांचे विरुद्ध खातेनिहाय चौकशी करून कारवाई करावी व केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला दोन महिन्याच्या आत पाठविण्यात यावा अशी समिती शिफारस करीत आहे.

(३) श्री. कोठेकर, ग्रामसेवक यांनी नियुक्तीच्या वेळी हलबा जातीचे प्रमाणपत्र सादर केले आहे. आता शासनाने हलबा या समाजास एस.बी.सी.मध्ये टाकलेले आहे. या प्रकरणास जवळपास २० वर्षांचा कालावधी झालेला आहे. तरी देखील सदर प्रकरण निकाली निघालेले नाही. ज्या अधिकाऱ्यांनी या

**प्रकरणाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले आहे. त्यांचे विरुद्ध देखील कारवाई झाली पाहिजे. या प्रकरणाकडे ज्या ज्या अधिकाऱ्यांनी जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले आहे त्यांचे विरुद्ध कारवाई करून केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला दोन महिन्याच्या आत पाठविण्यात यावा अशी समिती शिफारस करीत आहे.**

**(४) श्री.कोठेकर यांनी निधीची अफरातफर केलेली असल्याने त्यांना सन २००९ मध्ये निलंबित करण्यात आले आहे निलंबनाचा कालावधी चार वर्षांचा होऊन गेलेला असताना सुद्धा त्यांची अजूनही चौकशीच चालू आहे. चौकशी किती वर्षे चालू ठेवावी याला काही नियम आहेत. निलंबन प्रकरणी श्री. कोठेकर, ग्रामसेवक यांची विभागीय चौकशी करून केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला दोन महिन्याच्या आत पाठविण्यात यावा अशी समिती शिफारस करीत आहे.**

**(२) उर्दु शिक्षकांची राखीव पदे खुल्या प्रवर्गातून भरणे**

जिल्हा परिषद कार्यालयात झालेल्या बैठकीच्या वेळी शिक्षण विभागासंदर्भात दिलेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने कनिष्ठ महाविद्यालय शिक्षक व प्राथमिक शिक्षक उर्दु ही पदे अनुसूचित जमातीचे उमेदवार न मिळाल्यामुळे खुल्या प्रवर्गातून भरण्यात आलेली आहेत, असे नमुद केलेले आहे. अनुसूचित जमातीच्या जागेवर खुल्या प्रवर्गाचा उमेदवार भरण्याबाबतचा शासन निर्णय किंवा परिपत्रक समितीला विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी सादर करावी व कनिष्ठ महाविद्यालय व प्राथमिक शिक्षक उर्दू ही पदे खुल्या प्रवर्गातून भरण्यात आली असल्याबाबतचा अधिकचा खुलासा साक्षीच्या वेळी सादर करावा असे समितीने निदेश दिले.

दिनांक ९ मे २०१३ रोजी झालेल्या विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी समितीला वरील प्रकरणी पुढीलप्रमाणे लेखी स्वरूपात माहिती देण्यात आली.

शिक्षक संवर्गातील कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक व शिक्षण सेवकाची रिक्त पदे भरताना मागासवर्ग प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध झाले नाही तर (१) शासन निर्णय क्र.पीआरई २००१/(२८९९/२००१) प्राशि-१ दिनांक ६ ऑगस्ट २००१ (२) शासन निर्णय शालेय शिक्षण विभाग क्रमांक :- एस एस एन-१०००/(३६१/२००१) मा. शि-२ मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२, दिनांकित ७ डिसेंबर २००१ नुसार भरण्याची कारवाई करण्यात आली आहे. तसेच सन २००८-२००९ पासुन प्राथमिक शिक्षण सेवकाची रिक्त पदे भरती पूर्व लेखी परीक्षा लागू झाल्यानंतर मा. आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांचे दिनांक ९ फेब्रुवारी २०१० च्या पत्रानुसार खुल्या प्रवर्गातून भरण्याची कार्यवाही करण्यात आली आहे.

वरील माहितीच्या आधारे कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक व प्राथमिक शिक्षक (उर्दु) ही पदे अनुसूचित जमातीचे उमेदवार न मिळाल्यामुळे खुल्या प्रवर्गातून भरण्यात आलेली आहेत. उर्दू शिक्षकांच्या बाबतीत शासनाने परिपत्रक काढलेले आहे की, स्थानिक जिल्ह्यात अनुसूचित जमातीचे उर्दू शिक्षक उपलब्ध

झाले नाही तर राज्यातील इतर जिल्ह्यातून उपलब्ध करून घ्यावेत. परंतु या जिल्ह्यात त्या परिपत्रकाची अंमलबजावणी झालेली दिसून येत नाही म्हणून याबाबतचा अधिक खुलासा करावा, अशी समितीने विचारणा केली यावर मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांनी अमरावती जिल्ह्यात अनुसूचित जमातीच्या उर्दू शिक्षकाची भरती प्रक्रिया सुरू करण्यात आली होती. परंतु अनुसूचित जमाती या प्रवर्गातील उर्दू शिक्षक न मिळाल्यामुळे इतर प्रवर्गातून शिक्षकांची भरती करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे, यांच्या दिनांक ९ फेब्रुवारी २०१० रोजीच्या पत्रानुसार अनुसूचित जमातीची उर्दू शिक्षकांची पदे खुल्या प्रवर्गातून भरण्याची कार्यवाही केली आहे. त्या पत्रात असे नमूद करण्यात आले आहे की, अनुसूचित जमाती अथवा मागासवर्गीय प्रवर्गातील उर्दू शिक्षक उपलब्ध झाले नाही तर ती पदे खुल्या प्रवर्गातून भरण्यात यावी. शासनाच्या जी.आर.चा तसेच महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद यांच्या पत्राचा संदर्भ घेऊन अनुसूचित जमाती या प्रवर्गातील उर्दु शिक्षक उपलब्ध होऊ शकले नाहीत म्हणून खुल्या प्रवर्गातून ती पदे भरण्यात आलेली आहेत. असे समितीला सांगितले.

अनुसूचित जमाती या प्रवर्गातील उर्दु शिक्षक मिळावेत म्हणून विभागाने कोणत्या प्रकारचे प्रयत्न केले होते ? समाजकल्याण अधिकारी, प्रकल्प अधिकारी, आदिवासी विकास विभाग या कार्यालयाकडे अनुसूचित जमाती या प्रवर्गातील उमेदवारांची नावे नोंदली जातात. अनुसूचित जमाती या प्रवर्गातील उर्दू शिक्षक मिळाले नाहीत म्हणून खुल्या प्रवर्गातून पदे भरली. त्यामुळे अनुसूचित जमाती प्रवर्गावर एक प्रकारे अन्यायच केला गेला आहे. आदिवासी समाजाला रोजगार मिळावा, व्यवसाय मिळावा म्हणून या प्रवर्गासाठी आरक्षण ठेवलेले आहे. अनुसूचित जमाती या प्रवर्गातील उर्दु शिक्षकांची पदे भरण्यासाठी समाजकल्याण, तसेच प्रकल्प अधिकारी यांच्याकडून उमेदवारांची यादी मागविली असती तर काही प्रमाणात या प्रवर्गातील उर्दु शिक्षक उपलब्ध होऊ शकले असते. अशी समितीने पृच्छा केली असता, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांनी शासनाचे निर्णय व महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेचे पत्र यांचा आधार घेऊन ही उर्दू शिक्षकांची पदे भरलेली आहेत. अनुसूचित जमाती या प्रवर्गातील उर्दू शिक्षक भरण्यासंदर्भात वृत्तपत्रात जाहिरात देण्यात आली होती असे समितीला सांगितले.

तसेच विभागीय सचिव ग्रामविकास विभाग यांनी शिक्षक व शिक्षण सेवकाची मागासवर्ग प्रवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने दिनांक ६ ऑगस्ट २००१ रोजी शासन निर्णय काढलेला आहे त्यामध्ये मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्रमांक ६४२०/२००० मध्ये दिलेला निर्णय विचारात घेऊन शासन असे सर्वसाधारण आदेश देत आहे की, उर्दु माध्यमाच्या प्राथमिक शाळेमधून प्राथमिक शिक्षकांची रिक्त पदे भरण्यासाठी अनुसूचित जमाती तसेच अन्य मागासवर्गीय संवर्गातील उमेदवार उपलब्ध झाले नाहीत तर ती पदे अनारक्षित समजून या पदावर खुल्या प्रवर्गातील उमेदवारांची नियुक्ती करण्यात यावी. तसेच शालेय शिक्षण विभागाने दिनांक ७ डिसेंबर २००१ रोजी शासन निर्णय काढलेला आहे. त्यामध्ये शासनाने असा निर्णय घेतला आहे की, अल्पसंख्यांक व्यवस्थापनाने किंवा व्यवस्थापनामार्फत चालविण्यात येणाऱ्या उर्दु

माध्यमाच्या सर्व मान्यताप्राप्त प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व अध्यापक विद्यालये किंवा अन्य माध्यमाच्या मान्यता प्राप्त शासनातील उर्दु माध्यमांचे समांतर वर्ग यासाठी नियमानुसार देय असलेल्या मंजूर पदाचा सेवाभरती संदर्भात रोस्टरप्रमाणे आरक्षणासाठी स्वतंत्र प्रभाग (युनिट) समजण्यास यावा, मा. उच्च न्यायालयाचे आदेशानुसार उर्दू माध्यमाच्या शाळा किंवा अध्यापक विद्यालयामध्ये अनुसूचित जाती या संवंर्गासाठी विहित केलेले आरक्षण समर्थनीय नसल्याने या प्रभागासाठीच्या १०० बिंदू नामावलीतील अनुसूचित जातीचे बिंदू खुल्या प्रवर्गासाठी राहतील. उर्वरित म्हणजे अनुसूचित जमाती, इतर मागासवर्गीय, विमुक्त जाती व भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गासाठी १०० बिंदू नामवलीतील बिंदू तसेच राहतील. मात्र या प्रवर्गाचे पात्र उमेदवार संबंधित भरतीच्यावेळी उपलब्ध नसल्यास त्याप्रवर्गातील तेवढे बिंदू अनारक्षित समजून खुल्या प्रवर्गातील पात्र उमेदवारांमधून भरण्यात यावेत असे नमूद केलेले असल्याने सदरहू पदे भरलेली आहेत. म्हणजेच मागासवर्गीय प्रवर्गातील उर्दू शिक्षकांची रिक्त पदे भरण्यासाठी उमेदवार उपलब्ध झाले नाही तर खुल्या प्रवर्गातून सदरहू पदे भरण्यात यावीत अशा प्रकारच्या सूचना दिलेल्या आहेत. त्यानुसार सदरहू पदे भरण्याबाबतची कार्यवाही करण्यात आली आहे असे समितीला सांगितले.

जळगाव जिल्ह्यातील चोपडा येथे अनुसूचित जमातीतील “तडवी” या समाजाचे भरपूर उमेदवार मिळू शकतात. त्यांना उर्दू भाषेचे चांगले ज्ञान आहे. उर्दू शिक्षकांच्या नेमणूका करण्यासाठी अनुसूचित जाती, विमुक्त व भटक्या जमाती, इतर मागासवर्गीय या प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध होऊ शकतात. उर्दू शिक्षकांची पदे भरण्यासाठी अनुसूचित जमाती या प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध होऊ शकले नाहीत म्हणून आपण खुल्या प्रवर्गातील उमेदवारांना नेमणूका दिल्या. अनुसूचित जमाती या प्रवर्गातील उर्दू शिक्षक मिळावेत म्हणून त्यावेळी कोणत्या प्रकारचे प्रयत्न आपणाकडून केले गेले अशी समितीने विचारणा केली असता विभागीय सचिव, आदिवासी विकास विभाग यांनी उर्दू शिक्षकांची ३९ पदे मोठ्या संख्येने रिक्त आहेत. विद्यार्थ्यांना उर्दू भाषेचे शिक्षण दिल्यास त्यांना सहजपणे नोकरी मिळू शकते. तसेच ही पदे भरण्याकरिता उर्दू व मराठी या दोन्ही भाषांचे शिक्षण देणाऱ्या शाळा सुरू केल्या पाहिजेत. असे समितीच्या निदर्शनास आणून दिले.

**अभिप्राय व शिफारशी :-**

**(१) शिक्षण विभागाअंतर्गत कनिष्ठ महाविद्यालय शिक्षक व प्राथमिक शिक्षक उर्दु ही पदे अनुसूचित जमातीचे उमेदवार न मिळाल्यामुळे खुल्या प्रवर्गातुन भरण्यात आलेली आहेत, उर्दू शिक्षकांच्या बाबतीत शासनाने परिपत्रक काढलेले आहे की, स्थानिक जिल्ह्यात अनुसूचित जमातीचे उर्दू शिक्षक उपलब्ध झाले नाही तर राज्यातील इतर जिल्ह्यातून उपलब्ध करून घ्यावेत. परंतु या जिल्ह्यात त्या परिपत्रकाची अंमलबजावणी झालेली दिसून येत नाही. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे, यांच्या दिनांक ९ फेब्रुवारी २०१० रोजीच्या पत्रानुसार अनुसूचित जमाती अथवा मागासवर्गीय प्रवर्गातील उर्दू शिक्षक उपलब्ध झाले नाही तर ती पदे खुल्या प्रवर्गातून भरण्यात यावी. शासनाच्या जी.आर.चा तसेच महाराष्ट्र राज्य परीक्षा**

परिषद यांच्या पत्राचा संदर्भ घेऊन अनुसूचित जमाती या प्रवर्गातील उर्दु शिक्षक उपलब्ध होऊ शकले नाहीत म्हणून खुल्या प्रवर्गातून ती पदे भरण्यात आलेली आहेत. म्हणजेच मागासवर्गीय प्रर्वगातील उर्दू शिक्षकाची रिक्त पदे भरण्यासाठी उमेदवार उपलब्ध झाले नाही तर खुल्या प्रवर्गातून सदरहू पदे भरण्यात यावीत अशा प्रकारच्या सूचना दिलेल्या आहेत. उर्दू शिक्षकांच्या नेमणुका करण्यासाठी अनुसूचित जाती, विमुक्त व भटक्या जमाती, इतर मागासवर्गीय या प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध होऊ शकतात. अनुसूचित जमाती वर्गातील उर्दू शिक्षकांची ३९ पदे मोठ्या संख्येने रिक्त आहेत. रिक्त पदे भरण्याबाबत त्वरित कार्यवाही करण्यात यावी. तसेच ही पदे भरण्याकरिता उर्दू व मराठी या दोन्ही भाषांचे शिक्षण देणाऱ्या शाळा आदिवासी विकास विभागामार्फत सुरू करण्याबाबत कार्यवाही करावी व केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला पाठविण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.

(२) अनुसूचित जमाती प्रवर्गात उर्दू विषयाचे शिक्षक उपलब्ध होत नसल्यामुळे उर्दू शिक्षकांची ३९ पदे रिक्त आहेत. अनुसूचित जमाती प्रवर्गामध्ये उर्दू शिक्षक उपलब्ध होत नसल्यामुळे त्याच प्रवर्गातील ती पदे अन्य विषयांच्या माध्यमातून भरुन अनुसूचित जमातीची मोठ्या प्रमाणावर रिक्त असलेली पदे भरण्याबाबत योग्य ती तात्काळ कार्यवाही करावी अशी समिती शिफारस करीत आहे.

(३) जिल्हा परिषद कर्मच्या-याचे जात वैधता प्रमाणपत्र अवैध ठरविले असताना सुद्धा कारवाई न करणे :-

जिल्हा परिषद कार्यालयात झालेल्या बैठकीच्यावेळी श्री. ए. जी. सोनकुसळे, वरिष्ठ सहा (लेखा) यांचा प्रस्ताव समितीकडे सन २००२ मध्ये पाठविण्यात आलेला आहे. समितीने काही त्रुटी काढल्यामुळे श्री. ए.जी.सोनकुसळे यांचेकडून कागदपत्राची मागणी करण्यात आली होती. तथापि त्यांनी कागदपत्रे सादर केली नाहीत? याबाबत विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी समितीला केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करावा असे समितीने निदेश दिले.

दिनांक ९ मे २०१३ रोजी झालेल्या विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी समितीला पुढीलप्रमाणे लेखी स्वरूपात माहिती देण्यात आली.

श्री. ए.जी.सोनकुसळे, वरिष्ठ सहा (लेखा) यांचा प्रस्ताव समितीकडे दिनांक ४ ऑक्टोबर २००२ च्या पत्रान्वये परिपूर्ण कागदपत्रासह प्रस्ताव जातपडताळणी समितीकडे सादर करण्यात आले आहे. मा. आयुक्त तथा अध्यक्ष अनुसूचीत जमाती प्रमाणपत्र पडताळणी समिती यांचे पत्र क्र. १११६/०४ दिनांक १७ नोव्हेंबर २००४ अन्वये दिनांक ६ डिसेंबर २००४ रोजी श्री. ए. जी. सोनकुसळे यांची सुनावणी झालेली आहे. परंतु अद्यापपर्यंत जातपडताळणी समितीकडून जात वैध/अवैध बाबत कळविण्यात आलेले नाही. त्यानंतर पुन्हा मा. आयुक्त तथा अध्यक्ष अनुसूचित जमाती पडताळणी समिती, अमरावती यांना दिनांक २९ ऑक्टोबर २०१० च्या पत्रान्वये कळविण्यात आले होते. परंतु अद्यापपर्यंत जात वैध/अवैध बाबत समितीकडून पत्र प्राप्त

झाले नाही. संबंधित कर्मचाऱ्याला मु. का. अ. यांचे आदेश क्रमांक जिप/आस्था१/६६२/११ दिनांक १ फेब्रुवारी २०११ अन्वये जिल्हा परिषद सेवेतून बडतर्फ करण्यात आले होते. मात्र मा. कामगार न्यायालय यांचे दिनांक ४ एप्रिल २०१२ चे अंतरिम आदेशान्वये त्यांना पुर्ववत सेवेत सामावून घेण्यात आले आहे.

---

वरीलप्रमाणे दिलेल्या माहितीनुसार श्री. ए. जी. सोनकुसळे, वरिष्ठ सहा. (लेखा) यांचा प्रस्ताव समितीकडे कधी पाठविण्यात आला आहे. पडताळणी समितीने काही त्रुटी काढल्यामुळे श्री. सोनकुसळे यांचेकडून कागदपत्रांची मागणी करण्यात आली होती काय अशी समितीने पृच्छा केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांनी श्री. सोनकुसळे यांचा प्रस्ताव दिनांक १३ मार्च २००१ व दिनांक ४ ऑक्टोबर २००२ रोजीच्या पत्रान्वये परिपूर्ण कागदपत्रांसह जात पडताळणी समितीकडे सादर करण्यात आला. आयुक्त तथा अध्यक्ष, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र पडताळणी समिती यांचे दिनांक १७ नोव्हेंबर २००४ रोजीच्या पत्रान्वये श्री. सोनकुसळे यांची दिनांक ६ फेब्रुवारी २००४ रोजी सुनावणी झाली. अद्यापपर्यंत जातपडताळणी समितीकडून जातीच्या वैध/अवैध प्रमाणपत्राबाबत कळविण्यात आलेले नाही. संबंधीत प्रकरणाबाबत पुनश्च दिनांक २९ ऑक्टोबर २०१० रोजी वैध/अवैध प्रमाणपत्राबाबत अनुसूचित जमाती पडताळणी समितीला कळविण्यात आले आहे. त्यांनतर दिनांक १८ फेब्रुवारी २००९ रोजी सदर प्रकरण अवैध झाल्याचे पडताळणी समितीकडून कळविण्यात आले असता श्री. सोनकुसळे यांना दिनांक १ फेब्रुवारी २०११ रोजी जिल्हा परिषद सेवेतून बडतर्फ करण्यात आले होते. तथापि, या नंतर कामगार न्यायालयाच्या दिनांक ४ एप्रिल २०१२ रोजीच्या अंतरिम आदेशान्वये त्यांना पुन्हा सेवेत सामावून घेण्यात आलेले आहे. असे समितीला सांगितले.

सन २००९ मध्ये जातीचे प्रमाणपत्र अवैध असल्याचे जाहीर केल्यानंतर सन २०११ मध्ये त्यांना निलंबित केलेले आहे. म्हणजेच त्यांना २ वर्षे पदावर राहू दिले. याचे कारण काय? तसेच जिल्हा परिषद कर्मचाऱ्याने कामगार न्यायालयामध्ये जाण्याचे काहीच कारण नाही अशी प्रकरणे कामगार न्यायालयामध्ये दाखल करता येत नाहीत, ती उच्च न्यायालयामध्ये दाखल करावी लागतात अशी समितीने विचारणा केली असता विभागीय सचिव, आदिवासी विकास विभाग यांनी अनेकदा अशा प्रकारे कामगार न्यायालयामध्ये प्रकरणे दाखल केली जातात मात्र ती स्वीकारली जात नाहीत, त्यांना स्थगिती आदेश दिला जातो. जात प्रमाणपत्र वैध आहे की अवैध या संदर्भात कामगार न्यायालयामध्ये प्रकरण दाखल करता येते मात्र सेवेतून कमी करण्यात आल्यास त्या प्रक्रियेला आक्षेप घेता येत नाही. असे समितीला सांगितले.

समितीचा दौरा झाल्यानंतर या प्रकरणी अनूसूचित जमाती पडताळणी समितीकडे पत्र व्यवहार केला होता. परंतु त्यांच्याकडून माहिती आली नाही. त्यामुळे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी दिनांक १ फेब्रुवारी २०११ रोजीच्या आदेशान्वये श्री. सोनकुसळे यांना बडतर्फ केले. त्यानंतर श्री. सोनकुसळे हे मुख्य कार्यकारी

अधिकाऱ्यांच्या निर्णयाविरोधात कामगार न्यायालयात गेले. कामगार न्यायालयाच्या अंतरिम आदेशानुसार श्री. सोनकुसळे यांना पूर्ववत सेवेत सामावून घेण्यात आले. वास्तविक पाहता अनुसूचित जमाती पडताळणी समितीच्या निर्णयाला उच्च न्यायालयात आव्हान देता येते. परंतु या ठिकाणी संबंधित कर्मचाऱ्याने कार्यालयाच्या पद्धतीला आव्हान दिले आहे. जिल्हा परिषदेने या प्रकरणी दिनांक २९ ऑक्टोबर २०१० रोजी अनुसूचित जमाती पडताळणी समितीकडे वैध/अवैध प्रमाणपत्रासंदर्भात विचारणा केली होती. परंतु त्यांच्याकडून काहीही कळविण्यांत आले नव्हते. त्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी संबंधित कर्मचाऱ्याला बडतर्फ केले होते. परंतु कामगार न्यायालयाच्या आदेशान्वये त्यांना पुन्हा सेवेत सामावून घ्यावे लागले. तद्नंतर सन २००९ मध्ये अनुसूचित जमाती पडताळणी समितीने या कर्मचाऱ्याचे जात प्रमाणपत्र अवैध ठरविले. समितीच्या निर्णयाच्या आधारावर जिल्हा परिषद प्रशासनाकडून श्री. सोनकुसळे यांच्या बडतर्फीबाबत निर्णय घेण्यात आला. असे विभागीय सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीच्या निर्देशनास आणून दिले.

अनुसूचित जमाती पडताळणी समितीने श्री. सोनकुसळे यांचे जात प्रमाणपत्र अवैध असल्याचा निर्णय दिनांक १८ फेब्रुवारी २००९ मध्ये दिलेला असताना समितीच्या भेटीच्या वेळी म्हणजेच २०१० मध्ये तो निर्णय समितीच्या निदर्शनास का आणून दिला नाही. कामगार न्यायालयाने कशाच्या आधारावर स्थगिती दिली आहे समितीच्या असेही निदर्शनास आले आहे की, अनेक ठिकाणी बिगर आदिवासी व्यक्ती आदिवासी म्हणून सेवेत लागलेल्या आहेत. यामुळे मूळ आदिवासी नोकरीपासून वंचित राहतात. आदिवासींवरील अन्याय दूर करण्यासाठीच या समितीची नियुक्ती करण्यात आली आहे. भारताच्या संविधानानुसार आदिवासींना न्याय व अधिकार मिळवून देण्यासाठी समिती प्रयत्न करीत असते. जिल्हा परिषद प्रशासनाने संबंधित कर्मचाऱ्यावर कारवाई करून उच्च न्यायालयात जावे. तसेच या प्रकरणी अनुसूचित जमाती पडताळणी समितीने दिनांक १८ फेब्रुवारी २००९ मध्ये जात प्रमाणपत्र अवैध असल्याचा निर्णय देऊन सुद्धा त्या कर्मचाऱ्यावर विहित मुदतीत कारवाई करण्यात आली नाही. अनुसूचित जमाती पडताळणी समितीच्या दिनांक १८ फेब्रुवारी २००९ च्या निर्णयाचा आधार घेऊन संबंधितांवर कारवाई करावी. असे समितीचे मत आहे.

या प्रकरणांमध्ये कामगार न्यायालयाने जिल्हा परिषद प्रशासनाच्या निर्णयाला स्थगिती दिली आहे. मूळात कोणत्याही न्यायालयाने निर्णय दिल्यानंतर तो खोडून काढण्यासाठी आपली बाजू भक्कम असावयास पाहिजे. कामगार न्यायालयाला पटवून द्यावे लागेल की, अशा प्रकारचे आदेश देण्याचे त्यांना अधिकार नाहीत. त्यानंतर कामगार न्यायालयाच्या निर्णयाविरोधात उच्च न्यायालयात जावे लागेल असे विभागीय सचिव ग्रामविकास विभाग यांनी समितीला सांगितले. कामगार न्यायालयाने या प्रकरणी जात प्रमाणपत्राच्या वैध/अवैधतेच्या मुद्यावर स्टे दिला नाही. सन २००९ मध्ये अनुसूचित जमाती पडताळणी समितीने श्री. सोनकुसळे यांचे प्रकरण अवैध ठरविल्यामुळे पडताळणी समितीच्या निर्णयाचा आधार घेऊन या प्रकरणी योग्य ती कारवाई करावी असे समितीने निदेश दिले.

अभिप्राय व शिफारशी :—

जिल्हा परिषद कार्यालयातील श्री. ए. जी. सोनकुसळे, वरिष्ठ सहा. (लेखा) यांचा प्रस्ताव परिपूर्ण कागदपत्रासह जात पडताळणी समितीकडे ऑक्टोबर २००२ मध्ये पाठविण्यात आलेला आहे. परंतु अद्यापपर्यंत जातपडताळणी समितीकडून जात वैध/अवैध बाबत कळविण्यात आलेले नाही. त्यानंतर श्री.ए.जी.सोनकुसळे, वरिष्ठ सहा. (लेखा) यांचा प्रस्ताव परिपूर्ण कागदपत्रांसह जात पडताळणी समितीकडे सादर करण्यात आला. श्री. सोनकुसळे यांची दिनांक ६ फेब्रुवारी २००४ रोजी सुनावणी झाली. त्यांनतर दिनांक १८ फेब्रुवारी २००९ रोजी सदर प्रकरण अवैध झाल्याचे पडताळणी समितीकडून कळविण्यात आले असता श्री. सोनकुसळे यांना दिनांक १ फेब्रुवारी २०११ रोजी जिल्हा परिषद सेवेतून बडतर्फ करण्यात आले होते. तथापि, कामगार न्यायालयाच्या दिनांक ४ एप्रिल २०१२ रोजीच्या अंतरिम आदेशान्वये त्यांना पुन्हा सेवेत सामावून घेण्यात आलेले आहे. पडताळणी समितीने सन २००९ मध्ये जातीचे प्रमाणपत्र अवैध असल्याचे जाहीर केल्यानंतर सन २०११ मध्ये त्यांना निलंबित केलेले आहे. म्हणजेच त्यांना दोन वर्षे पदावर राहू दिले. पडताळणी समितीने दिनांक १८ फेब्रुवारी २००९ मध्ये निर्णय दिलेला असताना समितीच्या भेटीच्या वेळी म्हणजेच सन २०१० मध्ये तो निर्णय समितीच्या निदर्शनास आणून दिला नाही. आदिवासींवरील अन्याय दूर करण्यासाठीच या समितीची नियुक्ती करण्यात आली आहे. या प्रकरणी अनुसूचित जमाती पडताळणी समितीने दिनांक १८ फेब्रुवारी २००९ मध्ये जात प्रमाणपत्र अवैध असल्याचा निर्णय देऊन सुद्धा त्यांच्यावर कारवाई करण्यात आली नाही. पडताळणी समितीने श्री. सोनकुसळे यांचे प्रकरण अवैध ठरविल्यामुळे समितीच्या निर्णयाचा आधार घेऊन या प्रकरणी संबंधित अधिका-यांविरुद्ध योग्य ती कारवाई करून केलेल्या कारवाईबाबतचा अहवाल समितीला पाठविण्यात यावा अशी समिति शिफारस करीत आहे.

(४) आरोग्य सेवक (महिला) यांनी जात प्रमाणपत्र सादर न करणे :—

समितीने जिल्हा परिषद कार्यालयात झालेल्या बैठकीच्यावेळी आरोग्य विभागातील आरोग्य सेवक (महिला) श्रीमती एम.जी.धांडे, यांची सेवेत प्रथम केव्हा नियुक्ती झाली आहे व त्यांच्या जात वैधता प्रमाणपत्रा संबंधात साक्षीच्या वेळी माहिती सादर करावी असे निदेश दिले.

दिनांक ९ मे २०१३ रोजी झालेल्या विभागीय सचिवांच्या साक्षीच्यावेळी समितीस पुढीलप्रमाणे लेखी स्वरूपात माहिती देण्यात आली.

श्रीमती एम. जी. धांडे आरोग्य सेवक महिला प्रा. आ. केंद्र भातकुली यांची प्रथम नियुक्तीचा दिनांक १४ जुलै २००० असून ही नियुक्ती दिनांक १५ जून १९९५ नंतरची आहे त्यांची नियुक्ती अनुसूचित जमाती प्रवर्गामधून झालेली असल्याने त्यांना या कार्यालयाच्या दिनांक १ सप्टेंबर २००९, दिनांक १९ मे २००९, ५१४३ दिनांक ३१ ऑक्टोबर २००९, दिनांक ७ नोव्हेंबर २००९, दिनांक २७ जानेवारी २०१० रोजी च्या पत्रान्वये अंतिम कारणे दाखवानोटीस देऊन जात वैधता प्रमाणपत्र तात्काळ सादर करणेस्तव सूचीत

करण्यात आलेले आहे. त्या अनुषंगाने वैद्यकीय अधिकारी प्रा.आ.केंद्र भातकुली यांनी दिनांक १ फेब्रुवारी २०१० रोजी जात पडताळणी समितीला प्रस्ताव सादर करण्यात आला अद्यापही जात पडताळणी समितीकडून जात वैधता प्रमाणपत्र अप्राप्त आहे. तसेच या कार्यालयाच्या पत्राच्या दिनांक ११ ऑक्टोबर २०१०, दिनांक २५ मार्च २०१०, दिनांक १२ जानेवारी २०११ व दिनांक ७ फेब्रुवारी २०११ च्या पत्रान्वये जात पडताळणी समितीकडे सादर केलेल्या जात प्रमाणपत्र प्रस्तावानुसार वैध / अवैध बाबत तात्काळ कार्यवाही करणेबाबत सुचीत करण्यात आले आहे.

वरीलप्रमाणे प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे श्रीमती धांडे, आरोग्य सेविका यांची प्रथम नियुक्ती जुलै, २००० मध्ये झालेली आहे. शासन निर्णयानुसार त्यांच्याविरुद्ध अद्यापपर्यंत का कार्यवाही करण्यात आली नाही, यास जबाबदार कोण आहे, संबंधित अधिकाऱ्याविरुद्ध कोणती कारवाई करण्यात आली आहे? अशी समितीने विचारणा केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांनी जात पडताळणी प्रमाणपत्र सादर करण्यासाठी त्यांना दिनांक ३० सप्टेंबर २०१२ ही अंतिम मुदत दिली होती. परंतु त्यांच्याकडून अद्यापपर्यंत जात पडताळणी प्रमाणपत्र अप्राप्त आहे असे समितीला सांगितले. समितीने संबंधित कर्मचाऱ्याने सहा महिन्यांच्या आत जात पडताळणी समितीकडून जात पडताळणी प्रमाणपत्र आणून देण्याची जबाबदारी त्यांची आहे. जात पडताळणी प्रमाणपत्र सादर करण्याची जबाबदारी प्रशासनाची नाही. अशी पुन्हा पृच्छा केली. यावर विभागीय सचिव ग्रामविकास विभाग यांनी उमेदवारांने कागदपत्रे सादर केल्यानंतर समितीने त्यांना नोटीस दिली पाहिजे. ते विहित मुदतीत समितीसमोर आले नाही तर समितीने कारवाई केली पाहिजे. परंतु अनेकदा असे होते की, उमेदवाराने जात पडताळणी प्रमाणपत्रासाठी आवश्यक असलेली सर्व कागदपत्र सादर करून सुद्धा त्यांना जात पडताळणी समितीकडून काहीही कळविण्यात येत नाही. यामध्ये उमेदवाराचा काहीही दोष नसतो. परंतु जात पडताळणी समितीकडे असलेल्या प्रलंबित प्रकरणांमुळे जात पडताळणी प्रमाणपत्र सहा महिन्यांत मिळू शकत नाही. जात पडताळणी समितीच्या कारभाराचा परिणाम संबंधित कर्मचारी किंवा उमेदवारांवर होतो असे समितीला सांगितले. ज्या कर्मचाऱ्यांची रीतसर कागदपत्रे असतात त्यांची जातवैधता प्रमाणपत्रांची पडताळणी तीन-चार महिन्यांमध्ये होते. जर कागदपत्रे संशयास्पद असल्यास त्यासाठी माहिती गोळा करावी लागते त्यामुळे विलंब होतो. काही केसमध्ये दक्षता पथकास काही सापडत नाही म्हणून ते निकाल देत नाही. सहा महिन्याच्या आत जात पडताळणी समितीकडून जातवैधता प्रमाणपत्रासंबंधी निर्णय आला नाही तर ती जबाबदारी संपूर्णतः अर्जदाराची समजून त्याला नोकरीवरुन कमी करण्यात यावे अशी सूचना विभागीय सचिव, आदिवासी विकास विभाग यांनी केली.

जात पडताळणी समितीकडून एक वर्षामध्ये निर्णय झाला पाहिजे. तीन महिन्याच्या आत जातवैधता प्रमाणपत्र देणे आवश्यक आहे असा कायदा असताना आपण त्यासाठी सहा महिने देत आहोत. श्रीमती धांडे या "महादेव कोळी" या प्रवर्गातील आहेत. श्रीमती धांडे यांचे जातवैधतां प्रमाणपत्र अवैध केलेले नाही. श्रीमती धांडे यांचे प्रकरण पडताळणीसाठी केव्हा पाठविण्यात आले व दक्षता पथकाकडे केव्हा पाठविण्यात आले होते? अशी समितीने विचारणा केली असता सह आयुक्त, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र पडताळणी

समिती अमरावती यांनी श्रीमती धांडे यांना जानेवारी २०१३ मध्ये दक्षता पथकाने दिलेला अहवाल पाठविण्यात आला होता. त्यावर त्यांचे काही म्हणणे आले नाही तेव्हा त्यांना पुन्हा दिनांक २२ मार्च २०१३ रोजी स्मरणपत्र दिलेले आहे. दक्षता समितीचा अहवाल नकारार्थी आला होता व तो त्यांना पाठविण्यात आला होता. तथापि, त्यांना नैसर्गिक न्याय देणे आवश्यक होते. असे समितीसमोर विषद केले.

कर्मचाऱ्याने सहा महिन्यात जात वैधता प्रमाणपत्र सादर केले नाही तर त्यांच्यावर कारवाई करण्याचा आपणास अधिकार आहे. श्रीमती धांडे यांच्या संबंधिचा निर्णय जिल्हा परिषदेकडे केव्हा पाठविण्यात येणार आहे? खऱ्या आदिवासींना नैसर्गिक न्याय मिळण्यासाठी समिती येथे काम करीत आहे. जर त्यांना नैसर्गिक न्याय मिळत नसेल तर तो त्यांच्यावर अन्याय होईल? श्रीमती धांडे यांच्यावर कोणती कारवाई करणार आहात अशी समितीने विचारणा केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी जातवैधता प्रमाणपत्र पडताळणी समितीकडून दोन महिन्यात निर्णय आल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल असे समितीला आश्वासित केले.

अभिप्राय व शिफारशी :-

**श्रीमती एम. जी. धांडे आरोग्य सेवक महिला प्रा. आ. केंद्र भातकुली यांची प्रथम नियुक्तीचा दिनांक १४ जुलै २००० असा असून त्यांची नियुक्ती ही दिनांक १५ जून १९९५ नंतरची आहे. श्रीमती धांडे यांना जात वैधता प्रमाणपत्र तात्काळ सादर करण्याबाबत अंतिम कारणे दाखवा नोटीस देऊन सूचित करण्यात आलेले आहे तसेच त्यांची नियुक्ती अनुसूचित जमाती प्रवर्गामधून झालेली असून त्यांच्याकडून अद्यापपर्यंत जात पडताळणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले नाही. संबंधित कर्मचाऱ्याने सहा महिन्यांच्या आत जात पडताळणी समितीकडून जात प्रमाणपत्र आणून देण्याची जबाबदारी त्यांची आहे. सहा महिन्याच्या आत जात पडताळणी समितीकडून जातवैधता प्रमाणपत्रासंबंधी निर्णय आला नाही तर ती जबाबदारी संपूर्णत: अर्जदाराची समजून त्याला नोकरीतून कमी करण्यात यावे व केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला त्वरित पाठविण्यात यावा अशी समिती शिफारस करीत आहे.**

**जात पडताळणी समितीकडून एक वर्षामध्ये निर्णय झाला पाहिजे. तीन महिन्याच्या आत जातवैधता प्रमाणपत्र देणे आवश्यक आहे असा कायदा असताना त्यासाठी सहा महिने घेतात. श्रीमती धांडे यांचे जातवैधता प्रमाणपत्र अवैध केलेले नाही. अनुसूचित जमाती प्रमाणपत्र पडताळणी समिती अमरावती यांच्याकडून श्रीमती धांडे यांना जानेवारी २०१३ मध्ये दक्षता पथकाने दिलेला नकारार्थी अहवाल पाठविण्यात आला होता. त्यावर त्यांचे काही म्हणणे आले नाही. तथापि, त्यांना नैसर्गिक न्याय देणे आवश्यक होते. जर त्यांना नैसर्गिक न्याय मिळत नसेल तर तो त्यांच्यावर अन्याय होईल जातवैधता प्रमाणपत्र पडताळणी समितीकडून दोन महिन्यात निर्णय आल्यानंतर श्रीमती धांडे यांच्यावर पुढील कार्यवाही करण्यात येईल. असे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी समितीला आश्वासित केल्याप्रमाणे केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला दोन महिन्याच्या आत पाठविण्यात यावा अशी समिती शिफारस करीत आहे.**

(५) **जामुननाला साठवण तलाव-भूसंपादनाचा अंतिम निवाडाची रक्कम अदा करणे :—**

जिल्हा परिषद कार्यालयात झालेल्या बैठकीच्यावेळी जिल्हा परिषद यंत्रणेमार्फत घेण्यात आलेल्या जामुननाला येथील साठवण तलावाचे काम प्रगतीपथावर आहे. असा शेरा मारण्यात आला आहे, हे काम कधीपासून सुरू झाले, प्रशासकीय मान्यतेचा दिनांक व काम सुरू झाल्याचा दिनांक इत्यादी बाबतची माहिती समितीला साक्षीच्या बैठकीच्यावेळी सादर करावी असे समितीने निदेश दिले.

दिनांक ९ मे २०१३ रोजी झालेल्या विभागीय सचिवांच्या साक्षीच्यावेळी समितीला पुढीलप्रमाणे लेखी स्वरूपात माहिती देण्यात आली.

तलावाचे सद्यास्थितीत काम पूर्ण झालेले आहे. साठवण तलाव जामुननाला चे अंदाजपत्रकास प्र.मा. दिनांक डिसेंबर, २००८ मध्ये रुपये. ७.२६ लक्ष व तां.मा.कार्यकारी अभियंता यांनी दिनांक १५ डिसेंबर २००८ ला दिली. तलावाचा करार दिनांक २१ फेब्रुवारी २००९ ला झाला असून दिनांक २० ऑगस्ट २००९ पर्यंत सहा महिन्यांची मुदत दिलेली आहे. तलावांचे काम दिनांक २३ फेब्रुवारी २००९ ला सुरू झाले. तलावा मध्ये ऑक्टोबर, २०१० ला पाणी साठा झाला. तलावाचे सांडव्याचे ठिकाणी कठीण खडक लागल्यामुळे सांडव्याचे बांधकाम वगळण्यात आले. या प्रकल्पासाठी १.२७ हेक्टर जमीन संपादित केलेली आहे. भूसंपादनाचा अंतिम निवाडा झाला नसून ५ शेतकऱ्यांचे अंशदान देणे बाकी आहे.

वरीलप्रमाणे प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने जामुननाला येथील साठवण तलावाचे काम प्रगतीपथावर आहे, हे काम कधीपासून सुरू झाले व त्यास प्रशासकीय मान्यता केव्हा मिळाली अशी समितीने विचारणा केली असता, मुख्यकार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांनी हे काम सध्या पूर्ण झालेले आहे. भूसंपादनाच्या अंतिम निवाड्याचे पेमेंटचे देणे बाकी आहे. या प्रकल्पासाठी १.२७ हेक्टर्स जमीन संपादित केलेली आहे. या प्रकरणी जिल्हाधिकारी कार्यालयात सेक्शन कलमची कार्यवाही सुरू आहे. ज्या आदिवासींची जमीन घेतली त्यांना ८० टक्के रक्कम दिलेली असून अंतिम निवाड्याचे काम बाकी आहे. असे समितीला सांगितले या प्रकल्पांसाठी आदिवासींची जमीन घेतली जाते, परंतु त्याचा मोबदला मात्र दिला जात नाही. अंतिम निवाड्यांचे काम केव्हा पूर्ण होणार आहे? अशी समितीने पुन्हा विचारणा केली. असता जिल्हाधिकारी यांनी या प्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांना बोलावून घेतो आणि एका महिन्यात यावर निर्णय घेण्यात येईल असे समितीला आश्वासित केले.

**अभिप्राय व शिफारशी :—**

**जिल्हा परिषद यंत्रणेमार्फत घेण्यात आलेल्या जामुननाला येथील साठवण तलावाचे काम सद्यास्थितीत पूर्ण झालेले आहे. तलावाचे काम दिनांक २३ फेब्रुवारी २००९ ला सुरू झाले. तलावा मध्ये ऑक्टोबर, २०१० ला पाणी साठा झाला आहे. या प्रकल्पासाठी १.२७ हेक्टर्स जमीन संपादित केलेली असून**

**तलावासाठी घेण्यात आलेल्या जमिनीचा भूसंपादनाच्या अंतिम निवाड्याचे पेमेंट देण्याचे बाकी आहे. या प्रकरणी जिल्हाधिकारी कार्यालयात सेक्शन कलमची कार्यवाही सुरू आहे. ज्या आदिवासींची जमीन घेतली त्यांना ८० टक्के रक्कम दिलेली असून अंतिम निवाड्याचे काम बाकी असल्याने त्याचा मोबदला मात्र त्यांना दिला गेला नाही या प्रकरणी अंतिम निवाड्यांचे काम त्वरित होण्याच्या दृष्टिने जिल्हाधिकारी यांनी संबंधित अधिकाऱ्यांना बोलावून एका महिन्यात अंतिम निर्णय घेण्यात येईल असे समितीला आश्वासित केल्याप्रमाणे केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला पाठविण्यात यावा अशी समिती शिफारस करीत आहे.**

**(६) ग्रामीण पाणीपुरवठा जिल्हा परिषद या यंत्रणे कडील अपूर्ण असलेली कामे :-**

जिल्हा परिषद कार्यालयात झालेल्या बैठकीच्यावेळी ग्रामीण पाणीपुरवठा विभागाअंतर्गत ३० अपूर्ण पाणीपुरवठा योजना आहेत. २५ योजना भारत निर्माण कार्यक्रमअंतर्गत राबविण्यात येत आहे व ५ योजना कंत्राटदारामार्फत राबविण्यात येत आहे. याबाबतची सविस्तर माहिती समितीला सादर करण्यात यावी. तसेच कंत्राटदाराचे निकष काय आहेत. याची माहिती समितीला साक्षीच्यावेळी सादर करावी असे समितीने निदेश दिले.

दिनांक ९ मे २०१३ रोजी झालेल्या विभागीय सचिवांच्या साक्षीच्यावेळी समितीला पुढीलप्रमाणे लेखी स्वरूपात माहिती देण्यात आली.

ग्रामीण पाणीपुरवठा विभागाच्या ३० अपूर्ण योजना पैकी २५ योजना भारत निर्माण कार्यक्रमाअंतर्गत राबविण्यात येत आहे. २३ योजना पुर्ण करण्यात आल्या असून २ योजना अपूर्ण आहेत. यापैकी ढोमणी फाटा, ता: चिखलदरा पाणीपुरवठा योजना दरडोई खर्चाचे निकषात बसत नसल्यामुळे मंजुरीकरिता शासनास सादर करण्यात आलेला आहे. मंजुरी अद्याप अप्राप्त आहेत. मंजुरी प्राप्त होताच पुढील कार्यवाही करता येईल. तसेच धारणी पाणीपुरवठा योजनेचे काम समितीच्या वादामुळे रखडले आहे. टेंब्रुसोडा, ता. चिखलदरा व टेंभली, ता. धारणी येथील आश्रमशाळेकरिता पाणीपुरवठा योजनेच काम मूळ मंजूर योजनेनुसार पूर्ण करण्यात आले असून पाणीपुरवठा सुरू करण्यात आलेला आहे. परंतु फेब्रुवारी, २०१३ पासून उदभवाचे पाणी कमी होत असल्यामुळे या दोन्ही योजनांचे सुधारित अंदाजपत्रक तयार करून त्यास मंजुरी प्राप्त झालेली आहे व काम प्रगतीपथावर आहे. चिखली, ता. चिखलदरा व जारीदा, ता. चिखलदरा आश्रमशाळेचे पाणीपुरवठा योजनेचे काम पूर्ण करण्यात आले असून याद्वारे पाणीपुरवठा सुरू करण्यात आलेला आहे. कंत्राटकाद्वारे योजना पूर्ण करण्यासाठी पुढील निकष देण्यात आली आहे. त्यानुसार भारत निर्माण योजना तथा राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाअंतर्गत रुपये. ५.०० कोटी पर्यंतची योजना ग्रामपंचायत पाणीपुरवठा स्वतंत्र समितीमार्फत राबविण्यात येते. शासनाचे प्रचलित धोरणानुसार एजन्सी निश्चित करून

या योजना ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता यांच्या नियंत्रणाअंतर्गत पुर्ण करण्यात येतात. आदिवासी उप योजनेअंतर्गत ग्राम पंचायत पाणीपुरवठा योजना कंत्राटदारामार्फत शासनाचे प्रचलित धोरणानुसार पुर्ण करण्यात येतात.

वरीलप्रमाणे प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने ग्रामीण पाणीपुरवठा विभागातंर्गत ३० अपूर्ण पाणीपुरवठा योजना आहेत. २५ योजना भारत निर्माण कार्यक्रमांतर्गत राबविण्यात येत आहेत व ५ योजना कंत्राटदारांमार्फत राबविण्यात येत आहेत. याबाबतची माहिती तसेच कंत्राटदारांचे निकष काय आहेत. याबाबतचा खुलासा समितीसमोर विषद करावा अशी पृच्छा केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांनी असे सांगितले की, ३० अपूर्ण योजनांपैकी २५ योजना भारत निर्माण कार्यक्रमांतर्गत राबविण्यात येत आहेत. या २५ योजनांपैकी सोबत जोडण्यात येत असलेल्या अहवालानुसार २३ योजना पूर्ण करण्यात आल्या असून २ योजना अपूर्ण आहेत. मेळघाट तालुक्यात व्याघ्र प्रकल्प येतो त्यामुळे तेथे ब्लॉस्टींग करता येत नाही म्हणून ते काम रद्द केले आहे. हे काम ग्रामीण पाणीपुरवठा योजनेमार्फत करता येईल. पाच कोटी रूपयांची कामे ग्रामीण पाणीपुरवठा समितीमार्फत करता येतात. टेंभूसोडा, ता. चिखलदरा व टेंभुली, ता. धारणी येथील आश्रमशाळेकरिता पाणीपुरवठा योजनेचे काम मूळ मंजूर योजनेनुसार पूर्ण करण्यात आले असून पाणीपुरवठा सुरू करण्यात आला आहे. ते सुधारित अंदाजपत्रकाच्या मंजुरीसाठी राहिलेले आहे. सुधारित विहिरीचे काम सुरू आहे. विहिर खोदून आश्रमशाळांना पाणीपुरवठा सुरू झाला आहे, परंतु पाण्याचा स्त्रोत कमी असल्यामुळे नवीन सुधारित स्त्रोत घेतला असून त्याचे काम प्रगतीपथावर आहे. समितीने अपूर्ण असलेली कामे दिलेल्या आश्वासनानुसार पूर्ण करावी असे निदेश दिले.

अभिप्राय व शिफारशी :-

**ग्रामीण पाणीपुरवठा जिल्हा परिषद या यंत्रणेअंतर्गत ३० अपूर्ण पाणीपुरवठा योजना आहेत. त्यापैकी २५ योजना भारत निर्माण कार्यक्रमअंतर्गत राबविण्यात येत आहे व ५ योजना कंत्राटदारामार्फत राबविण्यात येत आहे.भारत निर्माण कार्यक्रमअंतर्गत २३ योजना पुर्ण करण्यात आल्या असून २ योजना अपूर्ण आहेत. या दोन्ही योजनांचे सुधारीत अंदाजपत्रक तयार करून त्यास मंजुरी प्राप्त झालेली आहे व काम प्रगतीपथावर आहे. समितीने ग्रामीण पाणीपुरवठा जिल्हा परिषद या यंत्रणेकडील अपूर्ण असलेले कामे दिलेल्या आश्वासनानुसार दोन महिन्यांत पूर्ण करावी व काम पूर्ण झाल्याचा अहवाल समितीला पाठविण्यात यावा तसेच शासनाकडे मंजुरीकरीता सादर करण्यात आलेल्या ढोमणी फाटा, ता. चिखलदरा पाणीपुरवठा योजना व धारणी पाणीपुरवठा योजनाच्या कामांना शासनाच्या संबंधित विभागाने त्वरित मान्यता देऊन या योजनाची कामे पूर्ण करण्यात यावी अशी समिती शिफारस करीत आहे.**

## जिल्हा परिषद, चंद्रपूर

### (१) प्रकल्प कार्यालयाअंतर्गत असलेल्या आश्रमशाळामध्ये शिक्षकांची रिक्त असलेली पदे :-

अनुसूचित जमाती कल्याण समितीची दिनांक ३ ते ५ फेब्रुवारी २०११ या कालावधीत चंद्रपूर येथे बैठक घेण्यात आली होती. समितीने जिल्ह्यातील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयअंतर्गत असलेल्या आश्रमशाळांना भेटी दिल्या असता अनेक आश्रम शाळेत शिक्षकांची पदे रिक्त असल्याचे आढळून आले. शिक्षकाची रिक्त पदे त्वरित भरण्याबाबत समितीने निर्देश दिले.

दिनांक २७ जून २०१३ रोजी विधान भवन मुंबई येथे विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली साक्षीच्यावेळी समितीने प्रकल्प कार्यालयअंतर्गत असलेल्या आश्रम शाळामधील शिक्षकाच्या रिक्त पदाबाबत विचारणा केली. साक्षीच्या वेळी सचिव आदिवासी विकास विभाग यांनी समितीला असे सांगितले की, प्रकल्प अधिकारी यांनी १४ आश्रमशाळांना भेटी दिलेल्या आहेत. २७ खाजगी आश्रमशाळांपैकी १६ आश्रमशाळांना त्यांनी भेटी दिलेल्या आहेत. भेटी देऊन पाहणी करण्याची बाब त्यांनी गंभीरपणे घेतली आहे.

अपर मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग (मागास वर्ग कक्ष) यांनी आदिवासी विभागात शिक्षणासाठी एक वेगळे आयुक्त पद निर्माण करण्याची आवश्यकता आहे. आदिवासी विभागात पाच लाख मुले/मुली शिक्षण घेतात, त्यासाठी विभागातर्फे दोन हजार कोटी रुपये खर्च होतात. प्रकल्प अधिकाऱ्यांचा ८० टक्के वेळ आश्रमशाळांमध्ये जातो तरी सुद्धा त्या व्यवस्थित चालविता येत नाहीत. पूर्वी आदिवासी विकास विभागाचे ५०० कोटी रूपयांचे बजेट होते, ते आता ४५००/- कोटी रुपयांचे झालेले आहे. जेणेकरून विकासाची कामे शासनाला करता येईल. शासन या बाबींवर पुरेसा निधी खर्च करीत असतानाही जर त्यांचा दर्जा सुधारत नसेल तर, याचा अर्थ प्रशासकीय योजनेमध्ये काही त्रुटी आहेत असा होतो. आदिवासी विकास विभागाकडील जवळपास ५५० आश्रमशाळा व ४५० वसतीगृहे यांच्या देखभाल, दुरुस्ती व बांधकामाकरिता वेगळी विंग करण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. परंतु, तो यशस्वी झाला नाही. विभागाकडे या करिता निधी उपलब्ध आहे, परंतु इमारत नाही अशी परिस्थिती आहे. याकरिता वन विभागाची काही जमीन आश्रमशाळांकरिता उपलब्ध करून दिली आहे. तसेच, पाटबंधारे विभाग देखील २०-२५ ठिकाणची जमीन आश्रमशाळांसाठी उपलब्ध करून दिली. या बाबतीत कधी निधी व जमीन दोन्ही उपलब्ध नियोजित अंदाजपत्रक तयार नसल्याने हे काम होऊ शकत नाही. याबाबत समितीला असेही विषद करण्यात येते की, आदिवासी विकास विभागात शिक्षण विभाग केला तर, शासन आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या प्रयोजनार्थ जो पैसा खर्च करते, त्याचा खऱ्या अर्थाने सदुपयोग होईल. तसेच आश्रमशाळांच्या बांधकामाकरीता आदिवासी विकास विभागात बांधकामाची वेगळी यंत्रणा सुरू केली तर आश्रमशाळांची बांधकामे त्वरित पूर्ण होतील. अशा प्रकारे प्रत्येक गोष्टीकरिता वेगळी यंत्रणा करून त्यांच्याकडे त्या त्या बाबीपुरते व्यवस्थापन दिले तर त्यांचा दर्जा निश्चितच सुधारेल. या करिता शिक्षण व बांधकामाची वेगळी यंत्रणा तयार करण्याबाबत समितीने शिफारस करावी.

अभिप्राय व शिफारशी :—

(१) आदिवासी विभागात पाच लाख मुले/मुली शिक्षण घेतात, त्यासाठी विभागातर्फे दोन हजार कोटी रुपये खर्च होतात. प्रकल्प अधिकाऱ्यांचा ८० टक्के वेळ आश्रमशाळांमध्ये जातो तरी सुद्धा त्या व्यवस्थित चालविता येत नाहीत. शासन या बाबींवर पुरेसा निधी खर्च करीत असतानाही जर त्यांचा दर्जा सुधारत नसेल तर, प्रशासकीय योजनेमध्ये काही त्रुटी आहेत असा त्याचा अर्थ होतो. त्यामुळे आदिवासी विकास विभागात शिक्षणासाठी एक वेगळे आयुक्त पद निर्माण केल्यास आदिवासी भागात शिक्षणाच्या दर्जात सुधारणा होईल. त्यानुसार आदिवासी विभागातील शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी वेगळे आयुक्त पद निर्माण करण्याबाबत तसेच शालेय शिक्षण विभागाप्रमाणे गट शिक्षणाधिकारी या पदाशी समकक्ष असलेल्या अधिकाऱ्यांची नियुक्ती करणेबाबत आदिवासी विकास विभागाकडून त्वरित कार्यवाही होण्याच्या दृष्टिने कारवाई करण्यात यावी व केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला तीन महिन्याच्या आत पाठविण्यात यावा अशी समिती शिफारस करीत आहे

(२) आदिवासी विकास विभागाच्या प्रकल्प कार्यालयाअंतर्गत जवळपास ५५० आश्रमशाळा व ४५० वसतीगृहे कार्यरत आहेत. या आश्रमशाळा व वसतीगृहाची देखभाल, दुरुस्ती व बांधकामाकरिता वेगळी यंत्रणा निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला होता परंतु, तो यशस्वी झाला नाही. आदिवासी विकास विभागाकडे याकरिता निधी उपलब्ध असून त्या विभागाची स्वतःची इमारत नाही अशी परिस्थिती आहे. वन विभागाने व पाटबंधारे विभागाने काही जमीन आश्रमशाळांकरिता उपलब्ध करून दिली आहे. परंतु या बाबतीत निधी व जमीन दोन्ही उपलब्ध असूनही बांधकामाचे अंदाजपत्रक तयार नसल्याने हे काम होऊ शकत नाही. याकरिता बांधकाम विभागाची नवीन यंत्रणा तयार केल्यास आश्रमशाळा व वसतीगृहाची देखभाल, दुरुस्ती व नवीन बांधकामाची कामे लवकरात लवकर करणे शक्य होईल व त्यांचा दर्जा निश्चितच सुधारेल. आदिवासी उपयोजनेंतर्गत विविध विभागांमार्फत विकासाची कामे सुरु असतात. वेगवेगळ्या विभागामार्फत कामे सुरु असल्यामुळे आदिवासी विभागाचे त्यावर नियंत्रण नसते. प्रकल्प अधिकारी किंवा आदिवासी विकास विभागाकडून देण्यात येणाऱ्या रकमेवर पूर्णतः या विभागाचे नियंत्रण नसते. त्यामुळे अपर आयुक्त, आदिवासी विकास विभाग यांच्या नियंत्रणाखाली सार्वजनिक बांधकाम विभागाप्रमाणे कार्यकारी अभियंता, उप अभियंता, शाखा अभियंता असलेल्या अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्याबाबत आदिवासी विकास विभागाकडून तात्काळ कार्यवाही करण्यात यावी. **केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला तीन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावा अशी समिती शिफारस करीत आहे .**

**(२) आदिवासी विकास विभागाने सुरक्षिततेच्या दृष्टिने गॅस शेगड्यांची जोडणी करणे :—**

समितीने गॅस शेगड्या अगोदर खरेदी करण्यात आल्या असून नंतर गॅस कनेक्शन घेण्यात आले आहे. त्यामुळे ३२६ गॅस शेगड्या गॅस कनेक्शन नसल्यामुळे पडून आहेत. गॅस शेगड्यांच्या बाबतीत मोठ्या प्रमाणावर अडचण आहे. याबाबत बीपीसील, एचपीसीएल, आयपीसीएल या गॅस एजन्सीजचे अधिकारी आणि पुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांची एकत्रित समिती गठीत केली होती, त्या समितीच्या मार्फत गॅस

कंपन्यांनी कनेक्शन द्यावे असे ठरले आहे. आदिवासी विकास महामंडळाचे जे कर्मचारी आहेत त्यांनी गॅस शेगड्यांची जोडणी करणे अपेक्षित आहे. परंतु एक व्यक्ती सर्वच ठिकाणी जाऊन हे काम करु शकत नाही. त्यामुळे वीजतंत्री यांना घरपोच पाठवून गॅस शेगड्यांची जोडणी केली जाते. प्रत्येक शेगडी जोडण्यापूर्वी गॅस एजन्सीकडून मान्यता मिळाली पाहिजे. जर गॅस कंपनीची मान्यता नसेल आणि एखादी दुर्घटना घडली तर नुकसानभरपाई मिळणार नाही. वन विभागाने गॅस शेगड्यांच्या कनेक्शनबाबत जसे धोरण आखले आहे तसेच धोरण आदिवासी विकास विभागाच्या बाबतीत सुद्धा अवलंबण्यात यावे अशी विचारणा केली असता, प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग यांनी वन विभागाच्या माध्यमातून ४० हजार गॅस शेगड्यांचे वाटप केले आहे. ३० हजार लोकांच्या शेगड्या सुरू झाल्या आहेत. गॅस शेगड्यांची जोडणी गॅस एजन्सीच्या माध्यमातून केली आहे. कारण ते सुरक्षिततेची हमी घेतात. वन विभागाच्या माध्यमातून वन क्षेत्रात मोहीम हाती घेतली होती. वन विभाग १२ सिलेंडरपर्यंत सबसिडी देणार असून, शेगडी विनाशुल्क देणार आहे. त्यामुळेच एक वर्षाची सबसिडी कायम केली आहे. असे समितीला सांगितले. समितीने या दृष्टीकोनातून जी काही कार्यवाही करावयाची असेल ती कार्यवाही करावी व गॅस शेगड्यांच्या जोडणीबाबतची सविस्तर माहिती समितीला सादर करावी, असे निदेश दिले.

अभिप्राय व शिफारशी :—

**आदिवासी विकास महामंडळाने गॅस शेगड्या अगोदर खरेदी केलेल्या असून नंतर गॅस कनेक्शन घेण्यात आले आहे. गॅस शेगड्यांना गॅस कनेक्शन नसल्यामुळे ३२६ गॅस शेगड्या पडून आहेत. बीपीसील, एचपीसीएल, आयपीसीएल या गॅस कंपनी अधिकारी आणि पुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांची एकत्रितरित्या गठीत करण्यात आलेल्या समितीच्या मार्फत गॅस कंपन्यांनी कनेक्शन द्यावे असे ठरले आहे व आदिवासी विकास महामंडळाच्या कर्मचारीमार्फत त्यांनी गॅस शेगड्यांची जोडणी करणे अपेक्षित आहे. वन विभागाने वन क्षेत्रात मोहीम हाती घेऊन ४० हजार गॅस शेगड्यांचे वाटप केले आहे. गॅस शेगड्यांची जोडणी गॅस एजन्सीच्या माध्यमातून केली आहे. कारण ते सुरक्षिततेची हमी घेतात. वन विभागाने गॅस शेगड्यांच्या कनेक्शनबाबत जसे धोरण आखले आहे त्याप्रमाणे आदिवासी विकास विभागाने सुरक्षिततेच्या दृष्टिने गॅस शेगड्यांच्या जोडणीबाबत धोरण तयार करून आवश्यक ती कार्यवाही करावी व केलेल्या कारवाईचा सविस्तर अहवाल समितीला तीन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावा अशी समिती शिफारस करीत आहे.**

(३) अनुसूचित जमातीतील अनुकंपा उमेदवारांच्या भरती प्रक्रियेतील टक्केवारी वाढविणे :—

समितीची जिल्हा परिषद कार्यालय चंद्रपूर येथे दिनांक ३ फेब्रुवारी २०११ रोजी बैठक घेण्यात आली. समितीने जिल्हा परिषद कार्यालयाकडे पाठविलेल्या प्रश्नावलीच्या अनुषंगाने समितीला दिलेल्या माहितीच्या आधारे समितीने दिनांक २२ ऑगस्ट २००५ पूर्वीच्या अनुकंपा यादीत अनुसूचित जमाती प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध नाहीत त्यामुळे अनुकंपा यादीतून पद भरण्यात आले नाही. परंतु दिनांक २२ ऑगस्ट २००५ नंतरच्या यादीत सहा उमेदवार उपलब्ध असल्याने पद भरण्यासाठी शासनास दिनांक १३ जानेवारी

२०११ च्या पत्रान्वये मंजुरी प्रदान करण्यास विनंती केलेली आहे. याबाबत साक्षीच्या बैठकीत अधिक खुलासा करावा, असे समितीने निदेश दिले.

समितीची दिनांक २७ जून २०१३ रोजी विभागीय सचिवांच्या साक्षीची बैठक घेण्यात आली साक्षीच्या वेळी समितीला केलेल्या कार्यवाही बाबत पुढीलप्रमाणे माहिती लेखी स्वरूपात देण्यात आली :—

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दिनांक २२ ऑगस्ट २००५ अन्वये "अनुकंपा नियुक्तीसाठी गट-क व गट-ड मध्ये प्रतिवर्षी रिक्त होणाऱ्या पदापैकी ५ टक्के पदे भरण्याबाबत मर्यादा विहित केली आहे." सन २०११ मध्ये मागासवर्गीयांचा अनुशेष भरतीमध्ये अनुकंपा ज्येष्ठतेनुसार ५ टक्के मर्यादेत अनुसूचित जमाती या प्रवर्गाचे उमेदवार नियुक्तीसाठी पात्र नसल्याने अनुकंपाखाली नियुक्ती देण्यात आली नाही. मात्र सन २०१२ मध्ये दोन अनुसूचित जमातीच्या अनुकंपा उमेदवारांना कनिष्ठ सहायक या पदावर जिल्हा परिषदेमध्ये नियुक्ती देण्यात आलेली आहे.

सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीसी-२०११/प्रक्र-८६/२०११/१६-ब, दिनांक २ ऑगस्ट २०११ अन्वये मागासवर्गीयांचा अनुशेष भरती मध्ये अनुसूचित जमाती या प्रवर्गात विविध संवर्गातील २२ रिक्त पदांपैकी १२ पदे भरण्यात आले व २ पदाकरीता प्रकरण न्यायप्रविष्ठ होते व उर्वरित ८ पदे ही उमेदवार उपलब्ध झाले नसल्याने रिक्त होती. सदरहू रिक्त पदामधून सन २०१२ ला ६ पदे भरण्यात आली आहे उर्वरीत ४ पदापैकी ३ पदांकरीता सन २०१३ मधील नियमित पद भरतीअंतर्गत लेखी परिक्षा घेण्यात आली. परंतु कनिष्ठ आरेखक, आरोग्य सेवक (पुरुष) व स्थापत्य अभियांत्रिकी सहायक या पदाकरिता एकही उमेदवार लेखी परिक्षेत पात्र झाले नसल्यामुळे सदर पदे रिक्त आहे. उर्वरीत आरोग्य (पु.) या संवर्गातील एक पद ३% पद भरती मर्यादेत बसत नसल्याने सदर पद रिक्त आहे. माहे जून, २०१३ मधील भरतीमध्ये अनुसूचित जमातीची ११ पदे भरण्यात आली आहे.

वरील प्राप्त माहितीच्या अनुषंगाने सचिव, ग्रामविकास विभाग यांनी शासनाने सन २०११ पासून ३ टक्के पदे भरण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत. आतापर्यंतचे जे संवर्ग आहेत त्यांची पदे एकाच वेळी भरण्यात आली तर ते पदोन्नतीसाठी सुद्धा एकाच वेळी पात्र ठरतात. म्हणून ही पदे टप्प्याटप्प्याने भरण्यास सांगण्यात आलेले आहे. परंतु काही संवर्गातील पदे ३ टक्के पद भरती मर्यादेत बसत नसल्यामुळे रिक्त राहतात. सार्वजनिक आरोग्य विभागातील काही संवर्गातील पदे तसेच अभियांत्रिकी संवर्गातील काही पदे १५ टक्क्यांपर्यंत भरण्यास सामान्य प्रशासन विभागाच्या प्रधान सचिवांनी परवानगी दिली आहे. इतर संवर्गातील पदे भरण्यासाठी टक्केवारीची मर्यादा वाढविण्याबाबत ग्रामविकास विभागाकडून सामान्य प्रशासन विभागाकडे मागणी करण्यात येणार आहे. त्यामुळे ३ टक्क्यांची मर्यादा वाढविण्याबाबत समितीच्या माध्यमातून सुद्धा शिफारस करण्यात यावी अशी सूचना केली.

अभिप्राय व शिफारशी :—

जिल्हा परिषद चंद्रपूर या कार्यालयात दिनांक २२ ऑगस्ट २००५ पूर्वीच्या अनुकंपा यादीत अनुसूचित जमाती प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध नाहीत त्यामुळे अनुकंपा यादीतून पद भरण्यात आले नाही परंतु दिनांक २२ ऑगस्ट २००५ नंतरच्या यादीत ६ उमेदवार उपलब्ध असल्याने पद भरण्यासाठी शासनास दिनांक १३ जानेवारी २०११ च्या पत्रान्वये मंजुरी प्रदान करण्यास विनंती केलेली आहे. सन २०११ मध्ये मागासवर्गीयांचा अनुशेष भरतीमध्ये अनुकंपा ज्येष्ठतेनुसार ५ टक्के मर्यादेत अनुसूचित जमाती या प्रवर्गाचे उमेदवार नियुक्तीसाठी पात्र नसल्याने अनुकंपाखाली नियुक्ती देण्यात आली नाही. शासनाने सन २०११ पासून ३ टक्के पदे भरण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत. आतापर्यंतचे जे संवर्ग आहेत त्यांची पदे एकाच वेळी भरण्यात आली तर ते पदोन्नतीसाठी सुद्धा एकाच वेळी पात्र ठरतात. म्हणून ही पदे टप्प्याटप्प्याने भरण्यास सांगण्यात आलेले आहे. परंतु काही संवर्गातील ३ टक्के पदे भरती मर्यादेत बसत नसल्यामुळे रिक्त राहतात. सार्वजनिक आरोग्य विभागातील काही संवर्गातील पदे तसेच अभियांत्रिकी संवर्गातील काही पदे १५ टक्क्यांपर्यंत भरण्यास सामान्य प्रशासन विभागाच्या प्रधान सचिवांनी परवानगी दिली आहे. त्याप्रमाणे जिल्हा परिषद कार्यालयातील इतर संवर्गातील पदे भरण्यासाठी ३ टक्केची मर्यादा वाढविण्याबाबतचा प्रस्ताव ग्रामविकास विभागाकडून सामान्य प्रशासन विभागाकडे पाठविण्यात यावा व सामान्य प्रशासन विभागाकडून केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला सादर करण्यात यावी अशी समिती शिफारस करीत आहे.

(४) जिल्हा परिषद कार्यालयातील कर्मचाऱ्यांकडून जात वैद्यता प्रमाणपत्र प्राप्त करून घेणे :—

जिल्हा परिषद कार्यालयाने २३७ कर्मचाऱ्यांची प्रकरणे जात पडताळणी समितीकडे पाठविलेली नाही. याबाबत कोणकोणत्या विभागाची किती प्रकरणे आहेत व यास जबाबदार कोण आहे. तसेच ज्या ६१ कर्मचाऱ्यांचे प्रस्ताव जात पडताळणी समितीने अवैध केलेले आहे यांच्याविरुद्ध कोणती कारवाई करण्यात येणार आहे, तसेच ज्या खाते प्रमुखांनी या कर्मचाऱ्यांना संरक्षण दिले होते ते खाते प्रमुख कोण आहेत त्यांना कारणे दाखवा नोटीस देऊन त्यांच्याविरुद्ध कोणती कारवाई करण्यात येणार आहे, याबाबतची माहिती समितीला सादर करण्यात यावी असे समितीने निदेश दिले.

दिनांक २७ जून २०१३ रोजी झालेल्या विभागीय सचिवांच्या साक्षीच्या बैठकीच्या वेळी समितीला पुढील प्रमाणे लेखी स्वरूपात माहिती देण्यात आली :—

जिल्हा परिषद कार्यालयातील २३७ कर्मचाऱ्यांपैकी २१९ कर्मचारी शिक्षण विभागातील आहे तर उर्वरित १३ कर्मचारी सामान्य प्रशासन विभाग व ५ कर्मचारी पंचायत विभागातील आहे. जिल्हा परिषद कार्यालयातील २३७ कर्मचाऱ्यापैकी २३५ कर्मचाऱ्यांचे जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे. उर्वरित २ कर्मचारी हे पंचायत विभागातील असून त्यातील (१) श्री के.एस.राऊत, ग्रामसेवक यांची जात गोंडगोवारी (वि.मा.प्र.) असून त्यांची प्रथम नियुक्ती ही दिनांक १५ जून १९९५ पूर्वीची असल्याने त्यांच्या

सेवेला शासन निर्णय दिनांक ३० जून २००४ नुसार १५ जून १९९५ पासून संरक्षण देण्यात आले आहे.
(२) श्री रविंद्र हिरालाल उपरडे, ग्रामसेवक यांची सेवा कार्यालयीन आदेश क्रमांक/पंचायत/टे०२/७०२८/२०११ दिनांक १३ जून २०११ पासून सेवा समाप्त करण्यात आली आहे. तद्नंतर त्यांनी अनुसूचित जमातीचे सादर केलेले जात वैधता प्रमाणपत्र अवैध ठरविण्यात आले असल्याने त्यांच्यावर दिनांक २७ फेब्रुवारी २०१२ ला पोलिस स्टेशन, रामनगर, चंद्रपूर येथे F.I.R. दाखल करण्यात आला आहे.

अनुसूचित जमाती कल्याण समितीच्या बैठकीच्या वेळेस असे निदर्शनास आले की, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीने ६१ उमेदवाराचे जात वैधता प्रमाणपत्र अवैध ठरविण्यात आलेले आहे, परंतु या उमेदवारांची जात अवैध ठरवण्यात आल्याबाबतचे प्रमाणपत्र जिल्हा परिषद कार्यालयाकडे पाठविण्यात यावे जेणे करून संबंधित कर्मचाऱ्यांवर कारवाई करणे सोईचे होईल असे पत्र सहआयुक्त जिल्हा परिषद कार्यालयाकडून व संशोधन अधिकारी, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, गडचिरोली यांना दिले आहे.

दिनांक ४ फेब्रुवारी २०११ ला उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.) यांनी व्यक्तीशः गडचिरोली येथील कार्यालयात जावून ६१ उमेदवाराचे अवैध ठरविलेले जात प्रमाणपत्र प्राप्त करून घेण्यासाठी विनंती केली असता त्यावेळी त्यांना एकूण ३५ उमेदवारांचे जात अवैध ठरविल्याबाबतचे प्रमाणपत्रे प्राप्त झाले. त्यापैकी ३३ उमेदवारांची जात वैधता प्रमाणपत्र अवैध ठरल्यामुळे नियुक्ती देण्यात आलेली नाही. नंतर एक उमेदवार श्री गुलाब बालाजी तळोधीकर, कक्ष अधिकारी यांची मूळ नियुक्ती खुल्या प्रवर्गातून झालेली आहे व सद्यःस्थितीत ते दिनांक ३१ डिसेंबर २००६ ला सेवानिवृत्त झालेले आहेत. तसेच श्री. चंद्रकांत संतोष सोनकुसरे यांची मूळ नियुक्ती दिनांक १६ एप्रिल १९८२ असून दिनांक ३० एप्रिल २००४ च्या शासन निर्णयानुसार त्यांना दिनांक १५ जून १९९५ ला सदर पदावर संरक्षण देण्यात आले आहे.

उर्वरीत २६ उमेदवारांची माहिती मिळवण्यासाठी या कार्यालयाचे दिनांक ९ फेब्रुवारी २०११, १ मार्च २०११, १९ मार्च २०११, २५ एप्रिल २०११ व ७ जून २०११ रोजी अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीला स्मरणपत्र दिलेली आहेत. त्यानुसार त्यांनी दिनांक १० जून २०१३ ला पुन्हा १७ कर्मचाऱ्यांची माहिती या कार्यालयास दिलेली आहे. त्यापैकी १३ कर्मचारी उपलब्ध प्राप्त माहितीनुसार जि.प. च्या आस्थापनेवर कार्यरत नाही.

(१) कु. सुधा तुळशिराम नंदूरकर, सहायक शिक्षिका ह्यांची दिनांक ११ ऑक्टोबर २००० ला खुल्या प्रर्वगातून निवड झालेली आहे.

(२) श्री. यशवंत सकुडे (ज्येष्ठ सहायक) यांची नियुक्ती दिनांक २२ मार्च १९९४ ची असून त्यांची हलबा (अ.ज.) जात अवैध ठरल्यामुळे त्यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपिठ नागपूर यांचेकडून स्थगनादेश दिनांक १२ मार्च १९९८ ला प्राप्त केला आहे. सदर प्रकरणी अंतिम निर्णय या कार्यालयास प्राप्त झालेला नाही.

(३) श्री. गोंविदा देवाजी धानोरकर कनिष्ठ सहायक यांची नियुक्ती दिनांक १७ सप्टेंबर १९९० ची अ.ज.या प्रवर्गातून झालेली असून त्यांना सेवेत दिनांक १५ जून १९९५ पासून संरक्षण देण्यात आलेले आहे.

(४) श्री. अरुणकुमार केशवराव भुरे, यांना मु.का.अ.जि.प. अलीबाग यांचे दिनांक ३१ मार्च १९९७ च्या आदेशाअन्वये कनिष्ठ सहायक या पदावर अनुसूचित जंमाती या प्रवर्गातून नियुक्ती दिली आहे. ६१ उमेदवारापैकी एकूण ४६ कर्मचाऱ्यांना नियुक्ती दिलेली नाही व ५ कर्मचारी दिनांक १५ जून १९९५ पूर्वीचे आहेत व एक कर्मचारी दिनांक १५ जून १९९५ नंतरचा असल्यामुळे त्यांची उक्त आदेशान्वये सेवा समाप्त करण्यात आलेली आहे. उर्वरीत ९ उमेदवारांची माहिती मिळविण्यासाठी या कार्यालयाने दिनांक १९ जून २०१३ नुसार अनुसूचित जमाती प्रमाणपत्र समितीला स्मरणपत्रे दिली आहेत.

**अभिप्राय व शिफारशी :—**

**अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीने ६१ उमेदवाराचे जात वैधता प्रमाणपत्र अवैध ठरविलेली आहे. त्यापैकी फक्त ३५ उमेदवाराचे जात अवैध ठरविल्याबाबतचे प्रमाणपत्रे जिल्हा परिषद कार्यालयास प्राप्त झाले. प्राप्त प्रमाणपत्रानुसार ३३ उमेदवारांना नियुक्ती देण्यात आली नाही. उर्वरित एका उमेदवारची नियुक्ती खुल्या प्रवर्गातून झाली आहे व ते दिनांक ३१ डिसेंबर २००६ ला सेवानिवृत्त झालेले आहेत व एक उमेदवार दिनांक ३० एप्रिल २००४ च्या शासन निर्णयानुसार त्याला सदरहू पदावर संरक्षण देण्यात आले आहे.**

**उर्वरीत २६ उमेदवारांपैकी १७ कर्मचाऱ्यांच्या प्राप्त झालेल्या माहितीपैकी आहे. १३ कर्मचारी जिल्हा परिषदेच्या आस्थापनेवर कार्यरत नाही. चार कर्मचा-यांना खुल्या प्रवर्गातून/शासन निर्णयानुसार संरक्षण देण्यात आले आहे. उर्वरीत ९ उमेदवारांची माहिती मिळविण्यासाठी या कार्यालयाने दिनांक १९ जून २०१३ नुसार अनुसूचित जमाती प्रमाणपत्र समितीला स्मरणपत्रे पाठविलेली आहे. पडताळणी समितीकडून नऊ कर्मचाऱ्यांचे जात वैद्यता प्रमाणपत्र प्राप्त झाल्या नंतर संबंधित कर्मचा-यावर योग्य ती कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला पाठविण्यात यावा अशी समिती शिफारस करीत आहे.**

**(५) प्राथमिक शिक्षकांचे नियमबाह्य समायोजन रद्द करणे :—**

पंचायत समिती, राजुरा येथील प्राथमिक शिक्षकाचे सन २००९-२०१० मध्ये नियमबाह्य समायोजन करून आदिवासी शिक्षक कर्मचाऱ्यांवर अन्याय केल्याबाबतची तक्रार प्राप्त झाली होती, त्याबाबत चौकशी करून काय कारवाई करण्यात आली आहे. याबाबतची माहिती समितीला कळविण्यात यावी, असे समितीने निदेश दिले.

दिनांक २६ जून २०१३ रोजी झालेल्या बैठकीच्या वेळी समितीला पुढीलप्रमाणे केलेल्या कार्यवाहीबाबतची माहिती देण्यात आली :—

प्राथमिक शिक्षकांचे सन २००९-२०१० मध्ये झालेले नियमबाह्य समायोजन रद्द करून नव्याने समायोजन करण्यात आले आहे. नियमबाह्य समायोजनासाठी जबाबदार असलेल्या गट विकास अधिकारी व गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, राजुरा यांचेवर विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली आहे. गट शिक्षणाधिकारी यांचा विभागीय चौकशीचा प्रस्ताव शिक्षण संचालक (माध्यमिक उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे पत्र क्रमांक शिक्षण/प्रास्थ-३(१)/सिमप्र/८७२, दिनांक १ जुलै २०११ अन्वये सादर केलेला आहे. त्यानंतर सदर प्रकरणातील मुद्यांच्या पुर्ततेबाबत दिनांक २४ जून २०१३ अन्वये शिक्षण संचालक (प्राथमिक) म. रा. पुणे यांना कळविले आहे. गट विकास अधिकारी यांचेवरील विभागीय चौकशीचा प्रस्ताव मा. सचिव, ग्रामविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडे मा. विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांच्या दिनांक ४ जुलै २०१२ रोजीच्या पत्रान्वये सादर करण्यात आलेला आहे. गट विकास अधिकारी यांचे विरुद्ध विभागीय चौकशी बाबतची सद्यस्थिती मिळण्याबाबत दिनांक १० जून २०१३ व दिनांक १८ जून २०१३ अन्वये उपसचिव (ग्रा.वि.व पं.रा.) यांना विनंती केलेली आहे. सदर प्रकरणी चौकशी प्रस्तावित करण्यात आलेली असून ही चौकशी दिनांक ३० जुलै २०१३ पर्यंत पूर्ण करून चौकशीचा अहवाल समितीला सादर करण्यात येईल, असे प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी आश्वासित केले. त्यानुसार उपरोक्त प्रकरणाबाबत केलेल्या चौकशीच्या अहवाल समितीला पाठविण्यात यावा, असे समितीने निदेश दिले.

अभिप्राय व शिफारशी :—

**प्राथमिक शिक्षकांचे सन २००९-२०१० मध्ये झालेले नियमबाह्य समायोजन रद्द करून नव्याने समायोजन करण्यात आले आहे. नियमबाह्य समायोजनासाठी जबाबदार असलेल्या गट विकास अधिकारी व गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, राजुरा यांचेवर विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली आहे. गट विकास अधिकारी यांचेवरील विभागीय चौकशीचा प्रस्ताव विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, यांच्याकडे दिनांक ४ जुलै २०१२ रोजी सादर करण्यात आलेला आहे. समितीने अधीक्षक अभियंता यांच्यामार्फत संबंधित अधिकाऱ्याची चौकशी करावी अशी सुचना केली होती. त्याप्रमाणे सदर प्रकरणी चौकशी प्रस्तावित करण्यात आलेली असून चौकशीचा अहवाल दिनांक ३० जुलै २०१३ पर्यंत पूर्ण करून समितीला सादर करण्यात येईल, असे यांनी आश्वासित केले आहे. त्यानुसार उपरोक्त प्रकरणाबाबत केलेल्या चौकशीचा अहवाल लवकरात लवकर समितीला पाठविण्यात यावा अशी समिती शिफारस करीत आहे.**

**(६) लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) या यंत्रणेकडून करण्यात आलेल्या कामांची चौकशी करणे :—**

लघु पाटबंधारेमार्फत बांधण्यात आलेल्या बंधाऱ्याची सचिवाच्या पातळीवर चौकशी करण्यात यावी व त्यासंदर्भात पाटबंधारे आणि आदिवासी विभागाच्या सचिवांची सुद्धा मदत घेण्यात यावी आणि सदर योजनेवर खर्च झालेला आहे किंवा नाही याची चौकशी करून कारवाई करण्यात यावी. या विभागाचे अधिकारी हे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी आहेत व त्यांच्या खात्यामध्ये दोष निर्माण झाला असल्यामुळे त्यांच्याकडून याप्रकरणी चौकशी करणे संयुक्तिक ठरणार नाही. त्यामुळे या प्रकरणी पाटबंधारे विभागाच्या अधीक्षक अभियंत्यामार्फत चौकशी करण्यात यावी. असेही समितीने बैठकीच्या वेळी निदेश दिले होते.

उपरोक्त दिलेल्या निदेशानुसार साक्षीच्या वेळी समितीला पुढीलप्रमाणे माहिती देण्यात आली :—

सामान्य प्रशासन विभागाचे पत्र क्र.साप्रवि/६०४/२०११ दिनांक १४ फेब्रुवारी २०११ अन्वये अधीक्षक अभियंता लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, नागपूर यांना जिल्ह्यातील आदिवासी योजनेअंतर्गत घेतलेल्या बंधाऱ्याच्या कामाची चौकशी करण्याबाबत विनंती करण्यात आली होती. तद्नंतर दिनांक १० मे २०११ रोजी अधीक्षक अभियंता लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, नागपूर यांना कोल्हापुरी बंधाऱ्याची चौकशी करून चौकशी अहवाल सादर करण्यास कळविले आहे. त्यानंतर पुन्हा दिनांक ४ मे २०१३ अन्वये बंधाऱ्याची **चौकशी करून चौकशी अहवाल** सादर करण्याबाबत विनंती करण्यात आली होती. तद्नुसार अधीक्षक अभियंता, लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, नागपूर यांनी आदेश क्रमांक/१६३५/चौकशी/२०१३, दिनांक ८ मे २०१३ अन्वये चौकशी अधिकारी म्हणून लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर) विभागाचे कार्यकारी अभियंता यांची नेमणूक करून चौकशी अहवाल ३० दिवसात मंडळ कार्यालयास सादर करण्याबाबत आदेश निर्गमीत केले आहेत. सध्या चौकशी अहवाल अप्राप्त आहे.

**अभिप्राय व शिफारशी :—**

**कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर)विभागामार्फत बांधण्यात आलेल्या बंधाऱ्यावर किती खर्च झालेला आहे किंवा नाही या प्रकरणी पाटबंधारे विभागाच्या अधीक्षक अभियंत्यामार्फत चौकशी करण्यात यावी. असे समितीने दिलेल्या निदेशान्वये अधीक्षक अभियंता, लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, नागपूर यांनी दिनांक ८ मे २०१३ अन्वये चौकशी अधिकारी म्हणून लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर) विभागाचे कार्यकारी अभियंता यांची नेमणूक केलेली असुन सध्या चौकशी अहवाल अप्राप्त आहे. या प्रकरणाचा चौकशी अहवाल एका महिन्यात मंडळ कार्यालयास सादर करून केलेल्या कार्यवाहीबाबतची माहिती समितीला सादर करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

(७) **चंद्रपूर जिल्हातील मौजा कोळसा गावाचे पुनर्वसन मौ. भगवानपूर येथे करणेः-**

दिनांक ५ फेब्रुवारी २०१३ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर येथे समितीची बैठक झाली. बैठकीच्या वेळी कोळसा गावाचे पुनर्वसन भगवानपूर या ठिकाणी केलेले असून तेथील लोकांना पाणी पुरवठ्याची सोय, रस्त्याचे सपाटीकरण, स्वतंत्र ग्रामपंचायत इत्यादी बऱ्याचश्या सुविधांपासून लोक वंचित आहेत. पुनर्वसित झालेल्या लोकांच्या मागण्याबाबत चौकशी करून समितीला अहवाल सादर करावा, असे समितीने निदेश दिले होते.

दिनांक २७ जून २०१३ रोजी झालेल्या विभागीय सचिवांच्या साक्षीच्या बैठकीच्या वेळी उपरोक्त प्रकरणी केलेल्या कार्यवाही बाबत समितीला पुढीलप्रमाणे लेखी स्वरूपात माहिती देण्यात आली :—

ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाअंतर्गत बाधित झालेल्या एकूण सहा गावापैकी पहिल्या टप्प्यात फक्त मौजा-कोळसा व बोटेझरी या गावाचे पुनर्वसन वन खंड क्रमांक ५२४ मौजा-टोलेवाही येथे करण्याबाबत केंद्र शासनाने दिनांक १६ जानेवारी २००२ रोजी मंजुरी दिलेली आहे. त्या आदेशान्वये केंद्र शासनाकडून शासन निर्णय क्रमांक डब्ल्युएल पी-१०-२०००/प्र.क्र.११८/फ-१, दिनांक १४ जुलै २००३ अन्वये गावाचे पुनर्वसन व मुलभूत नागरी सोयीसुविधा करीता सन २००३-२००४ मध्ये रुपये ४६३.०० लाख निधी मंजूर करण्यात आलेला आहे. पहिल्या टप्प्यामध्ये अभयारण्यातील मौजा कोळसा व बोटेझरी गावातील नागरिकांचे नवीन पुनर्वसीत ठिकाणी मौजा टोलेवाही येथे माहे मे व जून, २००७ मध्ये स्थलांतरण करण्याची कार्यवाही करण्यात आली. मौजा बोटेझरी या गावातील संपूर्ण ७९ कुटुंबाचे नवीन पुनर्वसीत ठिकाणी स्थलांतरीत झालेले आहे. परंतु मौजा कोळसा या गावातील अंशतः पुनर्वसन नवीन ठिकाणी झालेले आहे. कोळसा गावातील ९७ कुटुंबापैकी ४९ कुटुंबे मौजा भगवानपूर येथे स्थलांतरीत झाले आहे. उर्वरित कुटुंबाची पुनर्वसन प्रक्रिया सुरू आहे. NTVA च्या नविन धोरणानुसार प्रत्येक कुटुंबाला सुमारे १० लक्ष रूपये विकल्प -I, विकल्प-II नुसार देण्याची कार्यवाही सुरू आहे. त्यांना शासन निर्णयानुसार सार्वजनिक सुखसोई उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत.

एकूण १२८ कुटुंबांना (कोळसा - ४९ आणि बोटेझरी -७९) सुमारे ४७००० प्रति कुटुंब याप्रमाणे वाढीव अनुदान देण्यात आले आहे. तसेच शेती बदलून मागितलेल्या शेतकऱ्यांना मागणीनुसार जमीन बदलून देण्यात आली आहे. पुनर्वसीत भगवानपूर गावांत वास्तव्यास आलेल्या सर्व कुटुंबांना घरकुले बांधून देण्यात आलेली आहेत. नवीन रास्तभाव दुकान मंजूर करून धान्याचे वाटप व केरोसिनचे वाटप नियमित करण्यात येत आहे. या शिवाय इतर विभागाकडे असलेल्या शासकीय योजनांचा लाभ जसे पाळिव जनावरे वाटप, बि-बीयाणे व खतांचे वाटप, स्वच्छता गृहे, पाळीव जनावरांकरिता औषधोपचार, वैयक्तीक लाभार्थी योजना इत्यादी लाभ देण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे सदर गाव हे महसूल गाव म्हणून अधिसूचित करण्यात आलेले आहे. सर्व शेतकऱ्यांना ७/१२ चे उतारे देण्यात आलेले आहेत. सर्व प्रकल्प ग्रस्तांच्या पाल्यांना

प्रकल्प ग्रस्तांचे प्रमाणपत्रे देण्यात आले आहेत. या गावातील ५ व्यक्तींना वन विभागात वनरक्षक या पदावर नियुक्ती देण्यात आली आहे. याशिवाय नागरिकांनी मागणी केल्यानुसार शक्य होत असणाऱ्या सोई-सुविधा सुद्धा शासनाच्या विविध योजनाद्वारे पुरविण्यात येत आहे.

प्राप्त माहिती नुसार पुनर्वसित झालेल्या लोकांना सर्व सुविधा पुरविण्यात आल्या आहेत. तथापि कोळसा गावातील ९७ कुटुंबापैकी ४९ कुटुंबे मौजा भगवानपूर येथे स्थालांतरीत करण्यात आली आहे. उर्वरित ४८ कुटुंबाची पुनर्वसन प्रक्रिया अद्याप पूर्ण करण्यात आलेली नाही. ४८ कुटुंबाची पुनर्वसन प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करून त्या कुटुंबाना आवश्यक त्या सोयी सुविधा पुरविण्यात याव्यात, असे सिमितीने निदेश दिले.

**अभिप्राय व शिफारशी :—**

**ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाअंतर्गत बाधित झालेल्या एकूण सहा गावांपैकी पहिल्या टप्प्यात फक्त मौजा-कोळसा व बोटेझरी या गावाचे पुनर्वसन वन खंड क्रमांक ५२४ मौजा-टोलेवाही येथे करण्याबाबत केंद्र शासनाने दिनांक १६ जानेवारी २००२ रोजी मंजुरी दिलेली आहे. एकूण १२८ कुटुंबांपैकी कोळसा गावातील-४९ आणि बोटेझरी गावातील-७९ कुटुंबांना सुमारे ४७००० प्रति कुटुंब याप्रमाणे वाढीव अनुदान देण्यात आले आहे. पुनर्वसीत भगवानपूर गावात वास्तव्यास आलेल्या सर्व कुटुंबांना घरकुले बांधून देण्यात आलेली आहेत व इतर वैयक्तीक लाभार्थी योजना इत्यादी लाभ देण्यात आलेले आहेत. तथापी कोळसा गावातील ९७ कुटुंबापैकी ४९ कुटुंबे मौजा भगवानपूर येथे स्थालांतरीत करण्यात आली आहे. उर्वरित ४८ कुटुंबाची पुनर्वसन प्रक्रिया अद्याप पूर्ण करण्यात आलेली नाही. ४८ कुटुंबाची पुनर्वसन प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करून त्या कुटुंबांना आवश्यक त्या सोयी सुविधा पुरविण्यात याव्यात व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला तीन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावा अशी समिती शिफारस करीत आहे.**

**(८) शासन निर्णयानुसार जुलै, २०१३ पर्यंत जात प्रमाणपत्र सादर करणे :-**

अप्पर मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग (मागास वर्ग कक्ष) यांनी जात पडताळणी समितीकडे प्रलंबित असलेल्या प्रकरणा संदर्भात दिनांक १८ मे २०१३ रोजी शासन निर्णय काढला आहे. त्या शासन निर्णयामध्ये शासनाने काही सूचना दिल्या आहेत. ज्या कर्मचाऱ्यांनी जातीचे प्रमाणपत्र आणून दिली नाही त्यांनी पडताळणी समितीकडे जुलै, २०१३ पर्यंत अर्ज सादर करावेत. संबंधित कर्मचाऱ्यांने जात पडताळणी समितीकडे अर्ज केला नाही तर संबंधित विभागाने त्याच्याविषयी निर्णय घ्यावयाचा आहे. जात पडताळणी समितीला निर्णय घ्यायला सहा महिने वेळ दिला आहे, अशी कायद्यामध्ये तरतूद केली आहे. अन्यथा संबंधित कर्मचारी कोर्टात जातो आणि कोर्टाकडून सदरहू प्रकरणावर स्थगिती मिळवितो. पूर्वी सामाजिक

न्याय विभागाने एक शासन निर्णय काढला होता की, नोकरी लागल्यानंतर त्यांची जात पडताळणी संदर्भातील जबाबदारी त्या कार्यालयाच्या मुख्य विभागावर सोपविली होती. त्यावेळी ज्या कर्मचाऱ्यांनी विभागाकडे जात प्रमाणपत्र सादर केले आहे, परंतु विभागाने ते पडताळणी समितीकडे पाठविले नाहीत. त्यामुळे आता ज्या कर्मचाऱ्यांची आरक्षित पदावर निवड झाली असेल त्यांनी जात पडताळणीकडे प्रस्ताव सादर करावा आणि त्याची छायांकित प्रत मुख्य विभागाकडे व एक प्रत मागासवर्ग कक्षाकडे सादर करावी, असा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच आता **जे उमेदवार शासकीय सेवेत आहेत त्यांनी दिनांक ३१ जुलै २०१३ पर्यंत जात पडताळणी समोर अर्ज सादर करावयाचे आहेत. समितीने सहा महिन्याच्या आत त्यावर निर्णय घ्यावयाचा आहे आणि जात पडताळणीबाबत समितीने वेळेवर निर्णय दिला पाहिजे. पडताळणी समितीकडे प्राप्त झालेल्या अर्जावर तीन महिन्याच्या आत निर्णय घेतला नाही, किंवा कागदपत्रांच्या आधारे निकाल होत नसेल तर पडताळणी समितीने ठराविक मुदतीत निर्णय घ्यावयाचा आहे. यासाठी एखादे प्रकरण रेंगाळत असल्यास, आयुक्त जात पडताळणी समिती यांच्या मार्फत संबंधित समितीवर कारवाई करण्यात येईल, अशा आयुक्तांकडून जात पडताळणी समित्यांना सूचना देण्यात याव्यात. अशी समिती शिफारस करीत आहे.**

**जात प्रमाणपत्र सादरकरणेबाबत समितीने सुचविलेल्या सूचना :—**

(१) जात वैधता प्रमाणपत्र नसलेल्या कर्मचाऱ्यांना तातडीने सेवेतून मुक्त व ज्यांनी पदोन्नती घेतली आहे अशांना मूळ पदावर आणून खुल्या प्रवर्गात निवड करावी अशा प्रकारचा सुप्रीम कोर्टाचा निर्णय व शासन निर्णय (GR) आहे. अशा प्रकारे संबंधित कार्यालयाकडून करण्यात आलेल्या कारवाई प्रकरणी दिलेल्या नोटिसीच्या आधारे अधिकारी व कर्मचारी वर्गाकडून कामगार न्यायालयाचे किंवा औद्योगिक न्यायालयाचे स्थगितीचे आदेश आणले जातात असे सदर न्यायालयाचे आदेश संबंधित कर्मचाऱ्यांनी आणले असतील तर विभाग प्रमुखांनी असे आदेश मानू नये अशी शिफारस यापूर्वी समितीने आपल्या तिसऱ्या अहवालात (सन २०१०-२०११) केलेली होती. त्यानुसार शासनाने सदर मुद्याबाबत उद्योग, उर्जा व कामगार विभागाला आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत दिनांक १ जानेवारी, २०११ च्या पत्रान्वये कळविण्यात आलेले असतानासुध्दा जिल्हाधिकारी स्तरावरील संबंधित शासकीय यंत्रनांच्या अधिकाऱ्यांकडून कोणतीही कार्यवाही करण्यात आल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे जात प्रमाणपत्र अवैध ठरविण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांकडून कामगार व औद्योगिक न्यायालयाचे स्थगितीचे आदेश आणले जातात असे समितीच्या निदर्शनास आले आहे. जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने अधिकारी/कर्मचाऱ्याचे जात प्रमाणपंत्र अवैध ठरविल्यानंतर जात प्रमाणपत्र पडताळणी समितीच्या निर्णया विरोधात अनेकदा अधिकारी/कर्मचारी कामगार न्यायालयात दाद मागतात. शिवाय कामगार न्यायालय सुध्दा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीच्या निर्णयाला

स्थगनादेश देते. एखाद्या प्रकरणात जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने जात प्रमाणपत्र अवैध असल्याचा निर्णय दिल्यानंतर समितीच्या निर्णयाला कामगार न्यायालयाने स्थगनादेश देणे ही बाब नियमात बसते काय, वास्तविक पाहता जात प्रमाणपत्र पडताळणी समितीच्या निर्णयाला उच्च न्यायालयाव्यतिरिक्त अन्य कोणत्याही न्यायालयात दाद मागता येत नाही. त्यामुळे अधिकारी/कर्मचाऱ्यांनी उच्च न्यायालयाव्यतिरिक्त अन्य न्यायालयाकडे दाद मागता कामा नये. जात प्रमाणपत्र पडताळणी समितीच्या निर्णयाविरुद्ध उच्च न्यायालयात दाद न मागता अन्य न्यायालयांकडे दाद मागितल्यास संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्याला कारणे दाखवा नोटीस द्यावयास पाहिजे. जात प्रमाणपत्र पडताळणी समितीच्या निर्णयाला स्थगनादेश देणे ही बाब कामगार न्यायालयाच्या कक्षेत येत नसताना सुद्धा अशा प्रकारे स्थगनादेश देत असल्यामुळे राज्य शासनाने उच्च न्यायालयाच्या आदेशाव्यतिरिक्त अन्य न्यायालयांनी दिलेला आदेश ग्राह्य धरू नये असे सामान्य प्रशासन विभागामार्फत सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, स्थानिक स्वराज्य संस्था, महामंडळे इत्यादी कार्यरत असलेल्या शासकीय यंत्रणांच्या अधिकाऱ्यांना परिपत्रक/शासन निर्णयाद्वारे अवगत करण्यात यावे व केलेल्या कार्यवाहीची माहिती तात्काळ पाठविण्यात यावी अशी समिती शिफारस करीत आहे.

(२) जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने अधिकारी/कर्मचाऱ्याचे जात प्रमाणपत्र अवैध ठरविल्यानंतर संबंधित व्यक्तीचे जात प्रमाणपत्र या पूर्वी जिल्हाधिकारी स्तरावरून जप्त करण्याची कारवाई करण्यात येत होती, परंतु आता जात प्रमाणपत्र अवैध ठरविल्यानंतर अशा प्रकारची कारवाई होत नसल्याचे आढळून येते. त्यामुळे संबंधित यंत्रणांनी अवैध ठरविलेले जात प्रमाणपत्र तात्काळ जप्त करण्याबाबत जिल्हाधिकारी स्तरावरून कार्यवाही करण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना सूचना देण्यात याव्यात अशी समिती शिफारस करीत आहे.

(३) आदिवासींना त्रासदायक ठरणारी जात पडताळणी समिती तात्काळ रद्द करावी व त्याऐवजी अतिरिक्त जिल्हाधिकारी या दर्जाच्या स्तरावरील स्वतंत्र अधिकारी उपाध्यक्ष म्हणून नेमण्यात यावा. या समितीचे अध्यक्ष, आदिवासी विकास आयुक्त राहतील. विशेष समाज कल्याण अधिकारी व आदिवासी विकास विभागाचे प्रकल्प अधिकारी हे या समितीचे सदस्य राहतील, तसेच दक्षता समिती काढून टाकण्यात यावी. त्याप्रमाणे जात पडताळणीबाबत अपिल करण्याचे अधिकार आदिवासी विकास विभागाचे प्रधान सचिव, यांचेकडे राहतील. अशीही समितीने आपल्या तिसऱ्या अहवालात (सन २०१०-२०११) शिफारस केली आहे.जात प्रमाणपत्र पडताळणी समितीच्या निर्णयाविरुद्ध दाद मागावयाची झाल्यास थेट उच्च न्यायालयात जावे लागते. जात प्रमाणपत्र पडताळणी समितीच्या निर्णयाविरुद्ध दाद मागण्यासाठी उच्च न्यायालयापूर्वी एक माध्यम असणे आवश्यक आहे. उच्च न्यायालयात दाद मागण्यासाठी जाण्यापूर्वी जिल्हाधिकारी किंवा

आयुक्त, आदिवासी विकास विभाग यांच्याकडे एकदा दाद मागण्याची संधी संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यास उपलब्ध करून देण्यासाठी आदिवासी विकास विभागाकडून योग्य ती कार्यवाही करण्यात यावी अशी समिती शिफारस करीत आहे.

(४) बोगस असलेल्या आदिवासींनी शासकीय नोकऱ्या बळकावू नये म्हणून अनुसूचित जमातीच्या उमेदवाराला नियुक्ती पत्र देतानाच त्याच्याकडून प्रतिज्ञापत्रावर लिहून घ्यावयास पाहिजे की, " सहा महिन्यांच्या आत जात वैधता प्रमाणपत्र सादर केले नाही किंवा जात पडताळणी समितीने जात प्रमाणपत्र अवैध ठरविले तर माझी नोकरी तात्काळ संपुष्टात येईल. तसेच अधिनियमाच्या तरतुदीनुसार शिक्षा भोगण्यास मी तयार राहील. " अशा प्रकारचे प्रतिज्ञापत्र उमेदवारांकडून घेतल्यास बोगस आदिवासी सेवेत राहू शकणार नाहीत व मूळ आदिवासींना न्याय मिळेल. अशा प्रकारची कारवाई करण्याबाबत संबंधित विभागाकडून कार्यवाही करण्यात यावी, व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला तात्काळ पाठविण्यात यावा अशी समिती शिफारस करीत आहे.

**(९) समितीच्या बैठकीच्यावेळी संबंधित अधिकारी वर्ग अनुपस्थित राहणे :—**

समितीच्या असे निदर्शनास आले आहे की, समितीच्या बैठकी संबंधित नसलेल्यांना देखील विभागातर्फे समितीच्या बैठकीस बोलावण्यात आले होते. उदा.—एम.एस.ई.बी., एस.टी. महामंडळ इत्यादीचे अधिकारी आले होते. याबाबत कोण जबाबदार आहे याचा खुलासा करावा असे निदेश दिले. प्रकल्प अधिकारी यांनी जिल्हा बैठकीकरिता ज्यांना आमंत्रित करण्यात आले होते त्यांनाच बैठकीकरिता सांगण्यात आले आहे, असे समितीला सांगितले. समितीने उच्च न्यायालयामध्ये जनहित याचिकेवरील सुनावणीसाठी जावे लागल्याने संबंधित अधिकाऱ्यांना समितीच्या बैठकीमध्ये उपस्थित राहता येत नसल्याबाबतचे पत्र प्राप्त झालेले आहे. या संदर्भात असे सांगावयाचे आहे की, बऱ्याचदा असे दिसून येते की, ज्या दिवशी समितीची बैठक असते, त्याच दिवशी कोर्टामध्ये सुनावणी देखील असते. त्यामुळे अधिकाऱ्यांना समितीच्या बैठकीस उपस्थित राहता येत नाही. समितीने बैठकीची पुढील तारीख जरी दिली तरी, त्यावेळेसही असे होणार नाही याची खात्री नसते. त्यामुळे अशाप्रकारे वारंवार तारखा दिल्यावरही समितीचे कामकाज होत नाही. अधिकाऱ्यांना न्यायालयामध्ये सुनावणीकरिता जावे लागते व त्यासाठी त्यांनी गेले पाहिजे हे जरी बरोबर असले तरी, समितीला देखील घटनात्मक अधिकार आहेत व समितीचे कामकाजही झाले पाहिजे. त्यामुळे अधिकाऱ्यांना समितीची बैठक व सुनावणी करीता उपस्थित राहता यावे यासाठी काही मार्गदर्शकतत्त्वे निश्चित करणे आवश्यक आहे. जसे की, जर प्रथम समितीच्या बैठकीची नोटीस मिळाली असेल तर, प्रथम समितीच्या बैठकीस हजर राहणे इत्यादी. या बाबत योग्य तो निर्णय घेण्यात अशी समितीची सूचना आहे.

अभिप्राय व शिफारशी :—

समितीच्या बैठकीकरिता अधिकाऱ्यांना बोलाविण्यात आले असता संबंधित अधिकाऱ्यांकडून उच्च न्यायालयामध्ये जनहित याचिकेवरील सुनावणीसाठी जावे लागत असल्याने समितीच्या बैठकीच्यावेळी उपस्थित राहता येणार नाही असे कळविण्यात येते. समितीने या संदर्भात ज्या दिवशी समितीची बैठक असते, त्याच दिवशी कोर्टामध्ये सुनावणी देखील असते. त्यामुळे अधिकाऱ्यांना समितीच्या बैठकीस उपस्थित राहता येत नाही. त्यामुळे अशा प्रकारे वारंवार तारखा दिल्यावरही समितीचे कामकाज होत नाही. अधिकाऱ्यांना न्यायालयामध्ये सुनावणीकरिता जावे लागते व त्यासाठी त्यांनी गेले पाहिजे हे जरी बरोबर असले तरी, समितीला देखील घटनात्मक अधिकार आहेत व समितीचे कामकाजही झाले पाहिजे. त्यामुळे अधिकाऱ्यांना समितीची बैठक व सुनावणी यांस उपस्थित राहता यावे या करिता प्रथम कोणत्या बैठकीस प्राधान्य देण्यात यावे याबाबत सामान्य प्रशासन विभागाकडून काही मार्गदर्शक तत्त्वे निश्चित करण्यात यावीत अशी समिती शिफारस करीत आहे.

# (परिशिष्ट)

शासन निर्णय :—

(१) शालेय शिक्षण विभाग, दिनांक ६ ऑगस्ट २००१

(२) शालेय शिक्षण विभाग, दिनांक ७ डिसेंबर २००१

(३) शालेय शिक्षण विभाग, दिनांक ९ फेब्रुवारी २०१०

(४) सामान्य प्रशासन विभाग, दिनांक १८ मे २०१३

J. A. D. DHULE Z. P. DHULE FAX NO. : 02562235162 Feb. 09 2010 11:55AM P1

उपलब्ध झाली गोस्वामी (शिक्षण)

फोन : ०२० - २६१२९९१९

— २७ —

उर्दू माध्यमाच्या प्राथमिक शाळांमध्ये मागासवर्गीय संवर्गासाठी असलेली आरक्षीत पदे भरण्याबाबत

महाराष्ट्र शासन :
शालेय शिक्षण विभाग,
शासन निर्णय क्रमांक: पीआरई २००१/(२८३९/२००१)/प्राशि १,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ६ ऑगस्ट, २००१.

शासन निर्णय :

मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांनी याचिका क्रमांक ३६८१/२००० वर निर्णय देताना असे स्पष्ट केले आहे की, इस्लाममध्ये अनुसूचित जातीचा संदर्भ नसल्यामुळे या संवर्गासाठी जागा राखून ठेवणे समर्थनीय नाही. ही बाब विचारात घेऊन मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्रमांक ६४२०/२००० मध्ये निर्णय देताना जिल्हा परिषद, कोल्हापूर यांना असे आदेश दिले आहेत की, उर्दू माध्यमाच्या प्राथमिक शाळेतील रिक्त पदे खुल्या संवर्गातील उमेदवारांची नियुक्ती करुन भरण्यात यावीत.

मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्रमांक ६४२०/२००० मध्ये दिलेला निर्णय विचारात घेऊन शासन असे सर्वसाधारण आदेश देत आहे की, उर्दू माध्यमाच्या प्राथमिक शाळेमधून प्राथमिक शिक्षकांची रिक्त पदे भरण्यासाठी मागास जमाती तसेच अन्य मागासवर्गीय संवर्गातील उमेदवार उपलब्ध झाले नाहीत तर ती पदे अनारक्षित समजून त्यावर खुल्या प्रवर्गातील उमेदवारांची नियुक्ती करण्यात यावी.

हे आदेश सामान्य प्रशासन विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(शा.प्र.पांसे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

संचालक (प्राथमिक शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
संचालक (माध्यमिक व उच्चमाध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
प्रादेशिक शिक्षण उपसंचालक
शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद -
कार्यकारी अधिकारी, सर्व जिल्हा परिषदा
महापालिका, नगर परिषदा शिक्षण मंडळ/सर्व महानगरपालिका
वित्त विभाग,
कल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग
प्रशासन विभाग/आदिवासी विकास विभाग
शिक्षण विभागातील सर्व कार्यासने
प्रतिप्राशि-१
९९-G.R.-३७

उर्दू माध्यमिक शिक्षकांच्या शाळेमध्ये
समावेश न केलेबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण विभाग
शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग क्रमांक : एसएसएन १०००/(३६४/२००१)/माशि-२
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई- ४०० ०३२
दिनांक : १७ डिसेंबर, २००१.

पहावे : (१) विभागीय शिक्षण उपसंचालक, अमरावती यांचे पत्र क्र. माध्य-३/१९५५५/२००१, दिनांक ११ जून, २००१.
(२) याचिका क्र. ३६८२/२००० याचरील दि. २६/९/२००० या मा. उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ यांचा निर्णय.
(३) शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग क्र. पीआरई २००१/(२८१९/२००१)/माशि-१, दि. ९ ऑगस्ट, २००१.

पार्श्वभूमी :- मा. उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांनी याचिका क्र. ३६८२/२००० वर दिनांक २६ सप्टेंबर, २००० रोजी खालीलप्रमाणे निर्णय दिला आहे :-

So far as the issue regarding reservation for Scheduled Caste category candidates in Urdu Medium school is concerned, it is well settled by now that Islam does not recognise Scheduled Caste and there are castes amongst the Muslim religion belonging to other backward classes, Scheduled Tribes and VJNTs etc. We may in this regard, refer to [illegible] dated 3.[illegible].1978 and circular No.R.U.(SCT.V) dated 2.5.1975 issued by the Government of India, Ministry of Home Affairs, New Delhi. Clause 1(iv) of the said circular states that if the person claims to be scheduled caste, he should profess either the Hindu or the Sikh religion and if he claims to be a scheduled tribe, he may profess any religion,

ordinarily the persons holding the D.Ed qualifications and fulfilling the eligibility to be appointed as a Assistant teacher in the Urdu medium schools; beloinging to Muslim religion, and therefore there will be no justification in keeping reserved seats for scheduled caste candidates in such Urdu medium schools. The seats so reserved during this year will have to be transferred to the open category quota in such Urdu medium schools.

वरील पार्श्वभूमी सामान्य प्रशासन विभागाच्या निदर्शनास आणली असता त्या विभागाने या संदर्भात जाणिवपूर्वक निर्णय घ्यावा असे अभिप्राय दिले आहेत.

८. शासन निर्णय :- वरील सर्व बाबींचा साकल्याने विचार करुन या विशिष्ट परिस्थितीत शासनाने असा जाणिवपूर्वक निर्णय घेतला आहे की, अल्पसंख्यांक व्यवस्थापनाने किंवा अन्य व्यवस्थापनामार्फत चालविण्यात येणाऱ्या उर्दू माध्यमाच्या सर्व मान्यताप्राप्त प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व अध्यापक विद्यालये, किंवा अन्य माध्यमाच्या मान्यताप्राप्त शाळांतील उर्दू माध्यमाचे समांतर वर्ग यांसाठी नियमानुसार देय असलेल्या मंजूर पदाच्या संख्येइतकी संदर्भाधीन रोस्टरप्रमाणे आरक्षणासाठी स्वतंत्र विभाग (युनिट) समजण्यात यावा. मा. उच्च न्यायालयाचे आदेशानुसार उर्दू माध्यमाच्या शाळा किंवा अध्यापक विद्यालयामध्ये अनुसूचित जाती या संवर्गासाठी विहित केलेले आरक्षण लागू होत नसल्याने या प्रवर्गासाठीच्या १०० बिंदु नामावलीतील अनुसूचित जातीचे बिंदू खुल्या प्रवर्गासाठी आरक्षीत. उर्वरित म्हणजे अनुसूचित जमाती, इतर मागासवर्गीय, विमुक्त जाती व भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गासाठी १०० बिंदू नामावलीतील बिंदू तसेच राहतील. मात्र या प्रवर्गाचे पात्र उमेदवार, संबंधित भरतीच्यावेळी उपलब्ध नसल्यास त्या प्रवर्गातील ते बिंदू अनारक्षित समजून खुल्या प्रवर्गातील पात्र उमेदवारांमधून भरण्यात यावेत.

हे आदेश या आदेशाच्या दिनांकापासून लागू राहतील.

हे आदेश नगरपालिका, नगरपरिषद, महानगरपालिका, जिल्हा परिषद, कटक मंडळे यांचेमार्फत चालविल्या जाणाऱ्या प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व अध्यापक विद्यालये यांचेसाठीही लागू

(65)

वरील अनुक्रमांक तीन येथे नमूद केलेला शासन निर्णय शालेय शिक्षण विभाग क्र. प्राशिसं २००१/२८९९/प्राशि-१, दि. ६ ऑगस्ट, २००१ रद्द समजण्यात यावा.

हे आदेश सामान्य प्रशासन विभागाच्या सहमतीने व त्या विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ३११/२५-व, दि. २ मे, २००१ अन्वये निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( स. अ. शुक्ल आघिदी )
उपसचिव, महाराष्ट्र शासन,

प्रति,
शिक्षण संचालक (प्राथमिक).
शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे.
अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, राज्य मंडळ, पुणे.
आयुक्त, शासकीय परीक्षा मंडळ, महाराष्ट्र राज्य, पुणे.
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक,
सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), जिल्हा परिषद.
[illegible]
[illegible]
सामान्य प्रशासन विभाग.
अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्था महामंडळ १७८६, सदाशिव पेठ, पुणे- ४११ ०३०.
महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षक महामंडळ, श्रीनगर कॉम्प्लेक्स, कॅडल रोड, वॉर्ड क्र.५, वर्धा ४४२ ००१.
महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद, ब्लॉक-५, ४०, न्यू टेनामेंट्स, द. रा. महाजनी मार्ग, शिवडी, मुंबई- ४०० ०१५.
निवड नस्ती, प्राशि-१

टपालाने प्राप्त
दिनांक ५६३
१५।२।१०
शिक्षणाधिकारी प्रा.
जिल्हा परिषद, अमरावती

जा.क्र.मरापप/बापवि/सीईटी/२००९-१० /३५१
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे-१.
दि. ०९-०२-२०१०.

प्रति,
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद, अमरावती,

विषय : १) प्राथमिक शिक्षण सेवक भरती प्रक्रिया केंद्रीय भरतीपूर्व निवड परीक्षा सन २००९-१०.
२) उर्दु माध्यमाच्या प्राथमिक शाळांमध्ये मागासवर्गीय संवर्गासाठी असलेली अनारक्षीत पदे भरण्याबाबत.

संदर्भ : शासन निर्णय क्रमांक पीआरई२००१/(२८९९/२००१) दिनांक ०६ ऑगस्ट २००१

उपरोक्त संदर्भीय शासननिर्णयाचे कृपया आवलोकन व्हावे. या शासननिर्णयानुसार शासनाने उर्दु माध्यमाच्या प्राथमिक शाळामधील मागासवर्गीय संवर्गासाठी अनारक्षित पदे भरण्याबाबत आदेश दिलेले आहेत.

" उर्दु माध्यमाच्या प्राथमिक शाळामधील शिक्षण सेवक भरती करताना अनुसुचित जमाती तसेच अन्य मागासवर्गीय संवर्गातील उमेदवार उपलब्ध झाले नाहीत तर ती पदें अनारक्षीत समजून खुल्या संवर्गातील भरण्यात येतील. "

उपरोक्त शासन निर्णयाचा माहितीपुस्तिका व जाहिरातीमध्ये उल्लेख राहीलेला आहे, त्यामुळे स्थानिक वृत्तपत्रामध्यें या आशयाच्या मजकूरास विनामूल्य प्रसिध्दी देण्याची कार्यवाही करावी.

अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे

सोबत : शासननिर्णय
प्रत माहितीसाठी :-
१) शिक्षण संचालक (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे.
2) सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक.

मागासवर्गीय प्रवर्गातील कर्मचाऱ्यांबाबत जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी व जात प्रमाणपत्र अवैध ठरल्यास पुढील कार्यवाहीबाबत अनुसरावयाची कार्यपध्दती.

महाराष्ट्र शासन

सामान्य प्रशासन विभाग

शासन परिपत्रक क्रमांकः बीसीसी -२०१२/ प्र. क्र. ३३२/१२/१६-ब

मंत्रालय, मुंबई -४०००३२.

तारीख: १८ मे, २०१३.

<u>वाचा --</u>

१) शासन परिपत्रक, आदिवासी विकास विभाग, क्रमांक १४२०००/प्र.क्र.४३/का.१०, दि. १३.४.२००० (दिनांक २८ मे २००१ च्या शुध्दीपत्रकासह)

२) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्रमांक एसटीसी १०९९/प्र.क्र.१४/का.१०, दि. १६.८.२०००.

३) शासन परिपत्रक, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक सीबीसी १०/२००४/प्र.क्र.५७०/मावक-५, ५ मार्च २००५

४) शासन परिपत्रक, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,क्र.सीबीसी १०/२०१०/प्र.क्र.४७/मावक -५, दि. २६ मार्च २०१०

५) शासन परिपत्रक, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,क्र.सीबीसी १०/२०१०/प्र.क्र.५९०/ मावक -५, दि. ८ जून २०११

६) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी १०९४/प्र.क्र.६८/९४/१६-ब, दि. १५ जून,१९९५

(शा.म.मु.) एचबी १०२९—४ (६००—७-२०१३)

७) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी २००४/प्र.क्र.४५/०४/१६-ब, दि. २४ जून,२००४

८) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी २००२/प्र.क्र.९३/०४/१६-ब, दि. ३० जून,२००४

९) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी २००५/प्र.क्र.२८/०५/१६-ब, दि. १५.१२.२००५ (क्र. बीसीसी २०११/प्र.क्र.९२९/११/१६-ब, दि. ७ जानेवारी, २०१२ च्या शुध्दीपत्रकासह)

१०) महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २०००

शासन परिपत्रक —

उपरोक्त क्रमांक १ ते ५ येथील शासन निर्णय/परिपत्रक याव्दारे शासनाने शासकीय/ निमशासकीय, इत्यादी कार्यालयामध्ये कार्यरत असलेल्या मागासवर्गीय कर्मचाऱ्यांनी (जेथे "कर्मचारी" असा उल्लेख आहे तेथे कर्मचारी व अधिकारी या दोघांचाही समावेश होतो.) आपल्या जात प्रमाणपत्राची वैधता संबंधित जात पडताळणी समितीकडून तपासून घ्यावी, असे आदेश वेळोवेळी निर्गमित केले आहेत. तथापि, शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, अद्याप अनेक मागासवर्गीय कर्मचाऱ्यांनी त्यांच्या जात प्रमाणपत्राची वैधता तपासून घेण्यासाठी संबंधित जात पडताळणी समितीकडे प्रस्तावच सादर केलेले नाहीत, ही बाब अनुचित आहे. तसेच नियुक्ती प्राधिकारी/आस्थापना अधिकारी यांचेकडूनही शासनाच्या आदेशाचे पालन केले जात नाही, ही बाब गंभीर आहे.

२. महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० (यापुढे सदर अधिनियमाचा सोयीकरिता अधिनियम २००० असा उल्लेख करण्यात आला आहे.) हा कायदा दिनांक १८.१०.२००१ पासून अंमलात आला आहे. यातील कलम ६ नुसार, शासकीय/निमशासकीय इत्यादीच्या सेवेत कार्यरत असलेल्या प्रत्येक मागासवर्गीय कर्मचाऱ्याने,

आपल्या जात प्रमाणपत्राची वैधता, संबंधित जात पडताळणी समितीकडून तपासून घेणे आवश्यक आहे. यातील कलम १० च्या तरतुदीनुसार, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग या प्रवर्गामध्ये मोडत नसलेल्या, अशा कोणत्याही व्यक्तीने जातीचे खोटे प्रमाणपत्र सादर करुन, मागास प्रवर्गासाठी राखीव असलेल्या पदावर नियुक्ती मिळविली असेल, तर ती व्यक्ती सेवेतून तात्काळ सेवामुक्त केली जाण्यास पात्र ठरते आणि अशा व्यक्तीने घेतलेले अन्य कोणतेही लाभ काढून घेतले जाण्यास सुध्दा ती पात्र ठरते. महाराष्ट्र राज्य लोकसेवा (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग यांच्यासाठी आरक्षण) अधिनियम, २००१ हा कायदा दिनांक २९.१.२००४ पासून अंमलात आला आहे. यातील कलम ४(१) च्या तरतुदीनुसार, ज्या मागास प्रवर्गासाठी पद आरक्षित आहे त्याच मागास प्रवर्गाच्या उमेदवारामधून ते पद भरणे बंधनकारक आहे. हे पाहता, जात प्रमाणपत्राची वैधता तपासून न घेता एखादा कर्मचारी अनेक वर्षे शासन सेवेत रहात असेल, तर ते एक प्रकारे उपरोक्त तरतुदीचे उल्लंघन ठरते. त्यामुळे शासन आता खालील प्रमाणे सूचना देत आहे:-

(१) शासकीय/निमशासकीय इत्यादीच्या सेवेमध्ये कार्यरत असलेल्या मागासवर्गीय कर्मचाऱ्यांपैकी (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागास वर्ग या प्रवर्गांमधील) ज्यांनी अद्याप जात प्रमाणपत्राची वैधता तपासण्यासाठी जात पडताळणी समितीकडे अर्ज सादर केला नाही अशा कर्मचाऱ्यांनी, आपल्या जात प्रमाणपत्राची पडताळणी करण्यासाठी, आवश्यक त्या परिपूर्ण कागदपत्रांसह, अर्ज, संबंधित जात पडताळणी समितीकडे दि. ३१.७.२०१३ पर्यंत करावा व त्याबाबतची पोचपावती संबंधित कार्यालयातील आस्थापना अधिकारी यांना तात्काळ सादर करावी. प्रत्येक कार्यालयातील आस्थापना अधिकाऱ्यांनी त्यांच्या कार्यालयात कार्यरत असणाऱ्या मागासवर्गीय कर्मचाऱ्यांपैकी सर्व कर्मचाऱ्यांनी दि. ३१.७.२०१३ पर्यंत जात प्रमाणपत्राची पडताळणी करण्याबाबतचे प्रस्ताव जात पडताळणी समितीस सादर केलेले आहेत याची खातरजमा पावतीसह करुन घ्यावी.

(२) महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० यातील कलम ८ नुसार, आपण विशिष्ट जातीचे/ जमातीचे आहोत हे सिध्द करण्याची जबाबदारी संबंधित मागासवर्गीय कर्मचाऱ्यावर आहे. हे पाहता, उपरोक्त मुदतीत जे

मागासवर्गीय कर्मचारी आपल्या जात प्रमाणपत्राची पडताळणी करण्याबाबतचा अर्ज, संबंधित जात पडताळणी समितीकडे सादर करणार नाहीत, अशा कर्मचाऱ्यांवर, ते आपला जातीचा दावा सिध्द करु शकत नाहीत असा ठपका ठेवून, त्यांना एक महिन्याच्या कालावधीत जात वैधता प्रमाणपत्राची पूर्तता करण्यासाठी एक महिन्याची नोटीस देण्यात यावी. तद्नंतरही जात प्रमाणपत्र पडताळणीसाठी आवश्यक त्या कागदपत्राची पूर्तता न करणाऱ्या संबंधित कर्मचाऱ्यांच्या बाबतीत सदर कायदयातील कलम -१० नुसार त्यांच्या सेवा समाप्त करण्याची कारवाई करण्यात यावी.

(३) सर्व जात पडताळणी समित्यांना याव्दारे सूचना देण्यात येत आहे की, शासकीय/निमशासकीय, इत्यादी सेवेतील कर्मचाऱ्यांकडून प्राप्त झालेल्या जात प्रमाणपत्राची पडताळणी करण्याच्या अर्जावर सहा महिन्यांच्या कालावधीत समितीने योग्य तो निर्णय घ्यावा.

(४) जात पडताळणी समितीने जर एखाद्या कर्मचाऱ्याचे जात प्रमाणपत्र अवैध ठरविले तर त्याच्या सेवा तात्काळ समाप्त करण्यात याव्यात आणि त्याचेवर अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग अधिनियम, २००० मधील कलम ११ नुसार कारवाई करण्यात यावी. या संदर्भात स्पष्ट करण्यात येते की, अशा परिस्थितीत संबंधित कर्मचाऱ्यांच्या सेवा समाप्त करण्याची कार्यवाही विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन तातडीने करण्यात यावी.

(५) संदर्भाधीन अनुक्रमांक ६ ते ९ येथील आदेशांनुसार, अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राच्या आधारे दिनांक १५.६.१९९५ पूर्वी नोकरीस लागलेल्या कर्मचाऱ्यांचे जात प्रमाणपत्र अवैध ठरल्यास, त्यांच्या सेवेस संरक्षण देण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. मात्र अशा कर्मचाऱ्यांनी, ते ज्या मागास प्रवर्गाचे आहेत त्या मागास प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. जे कर्मचारी अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र अवैध ठरल्यानंतर ते ज्या मागास प्रवर्गाचे आहेत त्या मागास प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र सादर करु शकत नाहीत, अशा कर्मचाऱ्यांच्या सेवेस संरक्षण अनुज्ञेय नाही. अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राच्या आधारे दिनांक १५.६.१९९५ पूर्वी नोकरीस लागलेल्या अनेक कर्मचाऱ्यांनी जात प्रमाणपत्राची वैधता तपासण्यासाठी जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे अर्ज न करता अथवा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडून जात प्रमाणपत्र अवैध ठरले जाण्याची वाट न पाहता, अन्य मागास प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र सादर करुन सेवेस संरक्षण मिळविले आहे, अशा कर्मचाऱ्यांचे पूर्वीचे मूळ अनुसूचित

जमातीचे जात प्रमाणपत्र अधिनियम २००० मधील कलम ७ च्या तरतुदी नुसार जप्त करण्याची कार्यवाही होणे आवश्यक आहे. तरी अशा कर्मचाऱ्यांनी आपले अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र, ज्या प्राधिकाऱ्याने दिले आहे त्या प्राधिकाऱ्याकडे दि. ३१.७.२०13 पूर्वी जमा करावे व त्याबाबतची पोचपावती, संबंधित कार्यालयाच्या आस्थापना अधिकाऱ्यास सादर करावी अशी पोचपावती, सादर करणे आवश्यक असलेल्या कर्मचाऱ्यांकडे पाठपुरावा करण्याची जबाबदारी संबंधित आस्थापना अधिकाऱ्यांची राहिल. अशाप्रकारे जमा झालेली प्रमाणपत्रे रद्द करण्याची कार्यवाही संबंधित जात प्रमाणपत्र देणाऱ्या सक्षम अधिकाऱ्याने करावी व त्याबाबत संबंधित कर्मचाऱ्यांच्या आस्थापना अधिकाऱ्यास कळवावे या संदर्भातील पुढील सूचना, महसूल विभाग, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग व आदिवासी विकास विभाग यांनी, संबंधित यंत्रणांना द्याव्यात.

(६) दि. १५.६.१९९५ पूर्वी अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राच्या आधारे जे कर्मचारी शासनसेवेत लागले आहेत व ज्यांचे अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र अवैध ठरले आहे अशा कर्मचाऱ्यांनी, ते ज्या मागास प्रवर्गाचे आहेत त्या मागास प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र अद्याप सादर केले नसल्यास, प्रथम संबंधित जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने जात प्रमाणपत्र कायदयातील कलम ७ प्रमाणे अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र जप्त करुन घ्यावे व तशी पोच संबंधित कर्मचाऱ्यांना दयावी. अशा पोच पावतीसह संबंधित कर्मचाऱ्यांने ते ज्या मागास प्रवर्गाचे आहेत त्या प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र काढण्यासाठी आवश्यक कागदपत्रे, जात प्रमाणपत्र देणाऱ्या प्राधिकाऱ्याकडे दि. ३०.६.२०13 पर्यंत सादर करावीत. त्याकरिता दि. ३०.६.२०13 ही अंतिम मुदत राहील व दिनांक ३1.७.२०13 पर्यंत तो ज्या मागास प्रवर्गाचा आहे त्याप्रवर्गाचे जात प्रमाणपत्र त्याने सादर करावे. या मुदतीपर्यंत अशी कार्यवाही जे कर्मचारी करु शकणार नाहीत, अशा कर्मचाऱ्यांच्या सेवा विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन तातडीने समाप्त करण्यात याव्यात.

दि. १५.६.१९९५ पूर्वी अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राच्या आधारे नोकरीस लागलेल्या कर्मचाऱ्यापैकी, ज्या कर्मचाऱ्याचे जात प्रमाणपत्र, तपासणीसाठी जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे प्रलंबित आहे अथवा ज्यांनी अद्याप जात प्रमाणपत्र पडताळणीसाठी अर्जच सादर केलेला नाही, ते आपण अनुसूचित जमातीपैकी असल्याचा दावा सोडून देवून, ते ज्या मागास प्रवर्गाचे आहेत त्या मागास प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र आणि जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याचा विकल्प स्विकारु शकतात. त्यांनी तसे रुपये १००/- च्या स्टँम्प पेपरवर शपथ पत्राव्दारे संबंधित आस्थापना अधिकाऱ्यास

तातडीने कळवावे आणि त्यांनी त्या शपथपत्राची साक्षांकित प्रत, संबंधित जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे सादर करावी व त्याना त्यांचे अनुसूचित जमातीचे मूळ जात प्रमाणपत्र जप्त करण्याची विनंती करावी आणि त्यांनी ते ज्या मागास प्रवर्गाचे आहेत त्या मागास प्रवर्गाच्या जातीचे प्रमाणपत्र काढण्यासाठी आवश्यक कागदपत्रे जात प्रमाणपत्र देणाऱ्या प्राधिकाऱ्याकडे दि. ३०.६.२०१३ पर्यंत सादर करावी व त्याबाबतची पोचपावती संबंधित आस्थापना अधिकाऱ्यांस सादर करावी.

(७) जे कर्मचारी दिनांक १५.६.१९९५ पूर्वी अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राच्या आधारे सेवेत दाखल झाले व जात प्रमाणपत्राची वैधता तपासून न घेता, दि. १५.६.१९९५ नंतर सेवानिवृत्त झाले आहेत अथवा ज्यांनी दि. १५.६.१९९५ नंतर स्वेच्छा सेवा निवृत्ती घेतली आहे, अशा कर्मचाऱ्यांनी आपल्या अनुसूचित जमातीच्या जात प्रमाणपत्राची वैधता तपासून घेवून, या आदेशाच्या दिनांकापासून सहा महिन्यात, जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. उपरोक्त परि.क्र २ (६) मध्ये नमुद केल्याप्रमाणे दि. १५ जून १९९५ नंतर सेवानिवृत्त/स्वेच्छानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यानां सुध्दा सदर विकल्प स्वीकारता येईल. जे सेवानिवृत्त कर्मचारी वरील बाबींची पूर्तता या आदेशाच्या दिनांकापासून ६ महिन्यांच्या कालावधीत करणार नाहीत, त्यांचे सेवानिवृत्ती-वेतन तात्काळ थांबविण्यात येईल, अशा सूचना संबंधित कर्मचाऱ्यास तो ज्या कार्यालयातून सेवानिवृत्त झाला आहे, त्या कार्यालयाच्या नियुक्ती प्राधिकाऱ्याने तात्काळ द्याव्यात. विहित मुदतीत अनुसूचित जमातीचे जात वैधता प्रमाणपत्र अथवा ते ज्या मागास प्रवर्गाचे आहेत, त्या मागास प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र (त्यांचे अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र संबंधित जात पडताळणी समितीकडे परत केले असल्याच्या पोचपावतीसह) सादर न केल्यास, अशा कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्ती वेतन बंद करण्याची कार्यवाही जात पडताळणी अधिनियम, २००० मधील कलम १० च्या तरतुदीनुसार संबंधित नियुक्ती प्राधिकाऱ्याने करावी.

३. सदर शासन परिपत्रकातील आदेश शासकीय/निमशासकीय कार्यालये/ शासकीय उपक्रमातील सांविधानिक संस्था/ जिल्हा परिषदा/नगर परिषदा/ नगरपालिका/ महानगरपालिका/ग्रामपंचायती/मंडळे/महामंडळे/शासनाचे अंगीकृत व्यवसाय/विद्यापीठे/कृषी विद्यापीठे/शासकीय शिक्षण संस्था (आश्रमशाळांसह)/सहकारी संस्था/सहकारी साखर कारखाने/ सहकारी सूतगिरण्या/सहकारी बँका/सहाय्यक अनुदान मिळणाऱ्या शासनमान्य स्वेच्छा संस्था यांच्यासह अन्य ज्या ज्या प्रकारच्या संस्था व कार्यालये, यांना राज्याच्या तिजोरीतून निधी/

अनुदान/सहायक अनुदान मिळते अशा सर्व प्रकारच्या संस्था/मंडळे यांच्या आस्थापनेवरील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्ग या प्रवर्गातील सर्व अधिकारी/कर्मचारी यांना लागू आहेत. तसेच महाराष्ट्र राज्य लोकसेवा (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जाती ( विमुक्त जाती ) भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण) अधिनियम -२००१ च्या कलम २ मध्ये नमुद केलेल्या "आस्थापना" या व्याख्येत समाविष्ट होणाऱ्या आस्थापनेवरील सर्व अधिकारी/ कर्मचारी यांनाही लागू आहेत.

४. सदर परिपत्रक प्रशासकीय विभागांनी त्यांच्या अधिपत्याखाली असलेल्या सर्व विभागप्रमुखांच्या/ नियुक्ती प्राधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणावे. सर्व विभागप्रमुखांनी/ नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी/ आस्थापना अधिकाऱ्यांनी सदर परिपत्रकातील आदेश, लेखी स्वरुपात संबंधित कर्मचाऱ्यांच्या तात्काळ निदर्शनास आणावेत. याबाबतीत आवश्यक असलेली कार्यवाही तात्काळ करणे संबंधित कर्मचाऱ्यांवर व संबंधित अधिकाऱ्यांवर बंधनकारक राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१३०५१८१७२२४९९५०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Jayant Kumar Banthia

(जयंतकुमार बांठिया)

मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. राज्यपाल यांचे सचिव,

२. मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव,

३. उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,

४. सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,

५. मुख्य सचिव,

६. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग,

७. प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या अखत्यारीत असलेल्या सर्व जात प्रमाणपत्र पडताळणी समित्यांना तसेच जात प्रमाणपत्र देणाऱ्या सक्षम अधिकाऱ्यांना सदर परिपत्रकाची प्रत पाठवून त्यानुसार कार्यवाही करण्याच्या सूचना द्याव्यात.

८. सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या अखत्यारीत असलेल्या सर्व जात प्रमाणपत्र पडताळणी समित्यांना तसेच जात प्रमाणपत्र देणाऱ्या सक्षम अधिकाऱ्यांना सदर परिपत्रकाची प्रत पाठवून त्यानुसार कार्यवाही करण्याच्या सूचना द्याव्यात.

९. अपर मुख्य सचिव, महसूल व वन विभाग त्यांना विनंती करण्यात येते की त्यांनी त्यांच्या अखत्यारीत असलेल्या ज्या अधिकाऱ्यांकडून जात प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही केली जाते त्या अधिकाऱ्यांना सदर परिपत्रकाची प्रत पाठवून त्यानुसार कार्यवाही करण्याच्या सूचना द्याव्यात.

१०. सर्व विभागीय आयुक्त,

११. सर्व जिल्हाधिकारी,

१२. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,

१३. प्रबंधक, उच्च न्यायालय, मुळ शाखा, मुंबई,

१४. प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,

१५. प्रबंधक, लोकायुक्त आणि उपलोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,

१६. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,

१७. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई,

१८. राज्यातील सर्व महामंडळे आणि उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक,

१९. सर्व महानगरपालिकांचे आयुक्त,

(समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त)

## पहिली बैठक

## दिनांक २९ ऑक्टोबर २०१०

समितीची बैठक जिल्हा परिषद कार्यालय, अमरावती येथे झाली. सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते :—

### उपस्थिती

**समिती प्रमुख :**

(१) श्री. सुरेश धस, वि.स.स. तथा

**सदस्य :**

(२) श्री. रामरतनबापू राऊत, वि.स.स.

(३) श्री. एम. एम. शेख, वि.प.स.

(४) श्री. रमेश शेंडगे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. म. मु. काज, उप सचिव

(२) श्री. ला. ना. जाधव, समिती अधिकारी

**विभागीय प्रतिनीधी :—**

(१) श्री. ओम प्रकाश बकोरिया, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, अमरावती

(२) श्री. व्ही. जे वरवंटकर, अप्पर आयुक्त, आदिवासी विकास विभाग, अमरावती

(३) श्री. के.एम. अहमद, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी

(४) श्री. बी.जी. सोमवंशी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.)

(५) श्री. अरूण मोहोळ, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पं.)

(६) श्री.व.ख.महावरकर, सहायक आयुक्त, अ.ज.प्र.प. समिती

(७) श्री. म.मा. खोजरे, प्रकल्प अधिकारी

(८) श्री. सुनिल वारे, समाज कल्याण अधिकारी

(९) श्री. संजय यादगिरे, प्रभारी शिक्षणाधिकारी (माध्यमिक)

(१०) श्री. डी.पी.एस. दाळू, प्रभारी जिल्हा आरोग्य अधिकारी.

समितीने या बैठकीत अमरावती जिल्हा परिषद कार्यालयातील अनुसूचित जमातीचे अधिकारी/कर्मचारी यांची सरळसेवा भरती, बढती, आरक्षण व अनुशेष याबाबत तसेच आदिवासी जमातीकरिता राबविण्यात येणाऱ्या योजनांबाबत आढावा घेण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांबरोबर चर्चा करून माहिती घेतली.

## दुसरी बैठक

### दिनांक २८ जून २०१०

समितीची बैठक जिल्हा परिषद कार्यालय, चंद्रपूर येथे झाली. सदरहू बैठकीस खालील सन्मानीय सदस्य व अधिकारी उपस्थित होतेः-

**उपस्थिती**

(१) श्री. रमेश शेंडगे, वि.प.स. तथा कार्यकारी समिती प्रमुख

**सदस्य :**

(२) श्री. रामरतनबापू राऊत, वि.स.स.

(३) श्रीमती निर्मला गावित, वि.स.स.

(४) श्री. दौलत दरोडा, वि.स.स.

(५) श्री. धनराज महाले, वि.स.स.

(६) श्री. जगदीशचंद्र वळवी, वि.स.स.

(७) श्री. परशुराम उपरकर, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. म. मु. काज, उप सचिव

(२) श्री. ला. ना. जाधव, अवर सचिव (समिती)

**विभागीय प्रतिनीधी :—**

(१) श्री. ए. आर. शिंदे, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद

(२) श्री. प्रभू राजगडकर, अति. मुख्य कार्यकारी अधिकारी

(३) श्री. सुनिल निकम, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.)

(४) श्री. पी. एच. राठोड, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पं.)

(५) श्रीमती सुजाता गंधे, सहायक आयुक्त, मा.व.क. चंद्रपूर

(६) श्री. ए. एस. वळवी, सहायक आयुक्त, अनु.ज.क. समिती गडचिरोली

(७) श्री. अंकुश केदार, प्रकल्प अधिकारी, (जिगावविय)

(८) श्री. बी. ब्ल्यू. मून कार्यकारी अभियंता (बांधकाम)

(९) श्री. एस. जी. पेंदाम, समाज कल्याण अधिकारी

(१०) श्री. आर. पी. देशपांडे, शिक्षणाधिकारी (माध्यमिक)

(११) श्री. वाय. बी. रंगारी, शिक्षणाधिकारी (प्राथमिक).

समितीने या बैठकीत चंद्रपूर जिल्हा परिषद कार्यालयातील अनुसूचित जमातीचे अधिकारी/कर्मचारी यांची सरळसेवा भरती, बढती, आरक्षण व अनुशेष याबाबत तसेच आदिवासी जमातीकरिता राबविण्यात येणा-या योजनांबाबत आढावा घेण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांबरोबर चर्चा करून माहिती घेतली.

## तिसरी बैठक

## दिनांक ९ मे २०१३

समितीची बैठक विधान भवन, मुंबई येथे दुपारी २.०० वाजता घेण्यात आली. सदरहू बैठकीस खालील प्रमाणे समिती सदस्य व अधिकारी वर्ग उपस्थितीत होते :—

### उपस्थिती

**समिती प्रमुख :**

(१) श्री. जगदिशचंद्र वळवी, वि.स.स.

**सदस्य :**

(२) श्री. केवलराम काळे, वि.स.स.

(३) श्री. दिपक आत्राम, वि.स.स.

(४) श्री. हरिदास भदे, वि.स.स.

(५) श्री. प्रशांत बंब, वि.स.स.

(६) श्री. रमेश शेंडगे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. ला. ना. जाधव, अवर सचिव (समिती)

**विभागीय प्रतिनीधी :—**

(१) श्री. प्रविण परदेशी, प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग

(२) श्री. एस. एस. संधू, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग

(३) श्री. अरूण डोंगरे, जिल्हाधिकारी, अमरावती

(४) श्री. आनंद जगताप, मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प. अमरावती

(५) श्री. दि.रा. डिंगळे, उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग

(६) श्री. अ. दि. सूर्यवंशी, उप सचिव, आदिवासी विकास विभाग

(७) श्री. कैलास बंडलकर, उप सचिव, आदिवासी विकास विभाग

(८) श्री. एस. एम. सरकुंडे, आयुक्त, आदिवासी विकास विभाग, नाशिक

(९) श्री. अजय प्र. लहाने, सह. आयुक्त, मा. व. क. अमरावती

(१०) श्री. भास्करराव वाळिंबे, अपर आयुक्त, अमरावती

(११) श्री. बी. जी. सोमवंशी, उप मुख्य का. अ. (म.बा.क.) जि.प. अमरावती

(१२) श्री. व. ख. महावरकर, प्र. सहआयुक्त, अ. ज. प्र. प. समिती, अमरावती

(१३) डॉ. बी. एस. सोनावणे, जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प. अमरावती

(१४) श्री. मुकेश गनात्रा, प्रकल्प अधिकारी, धारणी.

समितीने या बैठकीत जिल्हा परिषद अमरावती या कार्यालयातील अनुसूचित जमातीचे अधिकारी/ कर्मचारी यांच्या सरळसेवा भरती, बढती, आरक्षण व अनुशेष इत्यादीबाबत विभागीय सचिव व संबंधित अधिकाऱ्यांची साक्ष घेतली.

## चौथी बैठक

## दिनांक २७ जून २०१३

समितीची बैठक दिनांक २७ जून २०१३ रोजी दुपारी २.०० वाजता विधान भवन, मुबंई येथे घेण्यात आली सदरहू बैठकीस खालील प्रमाणे समिती सदस्य व अधिकारी वर्ग उपस्थित होते.

**उपस्थिती**

**समिती प्रमुख :**

(१) श्री. जगदिशचंद्र वळवी, वि.स.स.

**सदस्य :**

(२) श्री. केवलराम काळे, वि.स.स.

(२) ॲड. के. सी पाडवी, वि.स.स.

(३) श्री. दिपक आत्राम, वि.स.स.

(४) श्री. हरिदास भदे, वि.स.स.

(५) श्री. प्रकाश शेंडगे, वि.स.स.

(६) श्री. दौलत दरोडा, वि.स.स.

(७) श्री. धनराज महाले, वि.स.स.

(८) श्री. शरद रणपिसे, वि.प.स.

(९) श्री. रमेश शेंडगे, वि.प.स.

(१०) डॉ. दीपक सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. म. मु. काज,उप सचिव

(२) श्री. ला. ना. जाधव, अवर सचिव (समिती)

**विभागीय प्रतिनीधी :—**

(१) श्री. पी. एस. मीना, अपर मुख्य सचिव, सा. प्र. वि., मंत्रालय, मुंबई.

(२) श्री. प्रविण परदेशी, प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग

(३) श्रीमती पल्लवी दराडे, अतिरिक्त आदिवासी आयुक्त, नागपूर

(४) श्री. पाटील, सहायक जिल्हा अधिकारी तथा प्रोजेक्ट आफिसर, नागपूर

(५) श्रीमती माधुरी खोडे, मुख्य कार्यकारी अधिकारी, चंद्रपूर

(६) श्री. ए. बी. घाडे. शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

(७) डॉ. ए. ए. आठल्ये, जिल्हा आरोग्य अधिकारी (चंद्रपूर)

(८) श्री. ए. एल. मुसळे, कार्यकारी अभियंता (बांधकाम) चंद्रपूर

## पाचवी बैठक

## दिनांक २३ जुलै २०१३

समितीची बैठक विधान भवन मुंबई येथे दुपारी ३-०० वाजता घेण्यात आली. सदरहू बैठकीस खालील प्रमाणे समिती सदस्य व अधिकारी वर्ग उपस्थितीत होते :—

### उपस्थिती

**समिती प्रमुख :**

(१) श्री. जगदिशचंद्र वळवी, वि.स.स.

**सदस्य :**

(२) श्री. केवलराम काळे, वि.स.स.

(३) श्री. हरिदास भदे, वि.स.स.

(४) श्री. शरद गावित, वि.स.स.

(५) श्री. उमाजी बोरसे, वि.स.स.

(६) श्री. दौलत दरोडा, वि.स.स.

(७) श्री. धनराज महाले, वि.स.स.

(८) श्री. अमरनाथ राजूरकर, वि.प.स.

(९) श्री. रमेश शेंडगे, वि.प.स.

(१०) डॉ. दिपक सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. म. मु. काज, उप सचिव

(२) श्री. ला. ना. जाधव, अवर सचिव (समिती)

समितीने या बैठकीत प्रारुप अहवालावर विचार केला व तो संमत केला.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

L-4